सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा
7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १९.०९.२०२६ | अंक नं. १४६ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

उत्सव मजुरीचा, डबल फायद्याचा..
{ ₹999/- दागिन्यांच्या प्रतीग्रॅम मजुरीवर }
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना तेवढी टक्के मजुरीत सूट
ऑफर 14 सप्टेंबर 2026 ते 8 ऑक्टोबर 2026 पर्यंतच वैध
उदा.
दागिन्यांचे वजन 1 ग्रॅम ते 10 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 10% लागणारी प्रतीग्रॅम मजुरी 899/-
दागिन्यांचे वजन 50 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 50% लागणारी प्रतीग्रॅम मजुरी 499/-
दागिन्यांचे वजन 100 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 100% मजुरीच नाही
योजनेचे नियम : 1) सोन्याच्या प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू. 2) एका वेळेस एकाच योजनेचा लाभ घेता येईल.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

# गणेश विसर्जनात विघ्न घालाल तर कारवाई

## जिल्हा पोलीस अधीक्षकांचा समाजकंटकांना इशारा



नगर - अहिल्यानगर पोलीस प्रशासनाने गणेश विसर्जन मार्गाची पाहणी करुन सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. मिरवणुकीत अडथळा निर्माण करणाऱ्या किंवा कायदा-सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिला.

मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक वैभव कुलबर्णे, डीवायएसपी डॉ. दिलीप टिपरसे, तोफखाना पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य आणि कोतवाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी मार्गाची पाहणी केली.

रामचंद्र खुंट, कापड बाजार, भिंगारवाला चौक, नेताजी सुभाष चौक, चितळे रोड आणि दिल्ली गेट या मार्गावरील परिस्थितीची पाहणी करण्यात आली. कापड बाजार परिसरातील रस्त्यांवर असलेल्या खड्ड्यांची दखल घेत ते तातडीने बुजविण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला देण्यात आले. मिरवणुकीदरम्यान गर्दीचे व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण आणि कायदा-सुव्यवस्था यासाठी पोलिसांनी विशेष नियोजन केले आहे. सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोनद्वारे मिरवणुकीवर नजर ठेवण्यात येणार असून, संवेदनशील ठिकाणी पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला जाणार आहे.

दरम्यान, ध्वनीविषयक नियमांचे उल्लंघन करणारे डीजे आढळल्यास नियमानुसार जप्तीची कारवाई केली जाईल. गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

उत्सवाला गालबोट लावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर थेट कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस अधीक्षकांनी दिला.

सर्व भक्तांना गणेशोत्सवाच्या, शारदीय नवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा.
भाजपा वकिल आघाडीचे अध्यक्ष
ॲड. चंदन बारटक्के
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
२१ सप्टेंबर
* शुभेच्छुक *
ॲड. शशांक कुलकर्णी (प्रसिध्दीप्रमुख भाजपा) | ॲड. विवेकजी नाईक (महाराष्ट्र प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य) | ॲड. अविनाश साखला (मा. सरचिटणीस भाजपा)
ॲड. राहुल रासकर (मा. अध्यक्ष भाजपा वकिल आघाडी) | डॉ.केशव भगवान बारटक्के (संचालक-श्रीकृष्ण क्लिनिक) | श्री.लक्ष्मीकांत तिवारी (भाजपा-भिंगार मंडल)
ॲड.सौरभ राऊत, ॲड. निखिल मुसळे, ॲड. संतोष भोसे, ॲड. वर्धमान भंडारी, ॲड. किरण वनारसे, ॲड. विजय महाजन
ॲड. संदिप काळे, ॲड. योगेश मांडोत, ॲड. सचिन घावटे, ॲड. कैलास कोतकर, ॲड. व्यंकटेश शिरसुल, ॲड. संदीप पडोळे
ॲड. हरिष कल्याणी, ॲड. आशिष पोटे, ॲड. गणेश शर्मा, ॲड. निखिल सुपेकर, ॲड. रविंद्र लगड, ॲड. देवेंद्र बंब
ॲड. रुपेश भामरे, श्री.अमोल बारटक्के, श्री.हर्ष बारटक्के, श्री.मंगेश फुटाणे, श्री.मोहन हेंद्रे, श्री.धीरज पडोळे, श्री.राजेश हेंद्रे
भारतीय जनता पार्टी — शहर वकिल आघाडी, सर्व पदाधिकारी, अहिल्यानगर

१, २, ५ रुपयांची चिल्लर घेतली जाईल
(स्टीलचे सोडून)
योग्य भावात
9767307397

नगर रोलिंग शटर
१) नवीन शटर मिळेल.
२)जुने शटर रिपेरिंग व ग्रिसिंग केले जाईल
पत्ता- नगर अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर (लोंढे मळा)
7350682390

वर्ष १८ वे
श्री महावीर प्रतिष्ठान (ट्रस्ट)
एक कदम समाज की उन्नती की ओर..
।। गणेशोत्सव २०२६ ।।
देखावा - आजची अहिल्या
* उद्घाटक व प्रमुख पाहुणे *
मा.आमदार संग्रामभैय्या जगताप । मा.श्री. नरेंद्रजी फिरोदिया
मा.श्री. धनंजयजी जाधव (उपमहापौर) । मा.श्री. अनिलजी मोहिते
मा.डॉ. प्रकाशजी कांकरिया । मा.श्री. राजेशजी भंडारी । मा.श्री. निखिलजी लुणे
मा.श्री. रोहनजी गांधी । मा.श्री. सिध्दार्थजी गांधी । मा.श्री. ललितजी गुंदेचा ।
तसेच सर्व देणगीदार
देखावा उद्घाटन - शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी सायं. ७ वा.
स्थळ - माणिक चौक, अहिल्यानगर.
* निमंत्रक *
श्री महावीर प्रतिष्ठाण (ट्रस्ट)
अध्यक्ष - हर्षल बोरा व सर्व सभासद

गणपती बाप्पा मोरया!!!
श्रध्दा... सेवा... समर्पण...
यांचं सुंदर प्रतीक
समाजातील गरजूंना मदत करण्यासाठी सदैव तत्पर असणारे, सेवाभाव आणि माणुसकीला सर्वोच्च मानणारे विनीत अजीत बोरा हे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत.
त्यांच्या मनात वसलेला दातृत्वभाव, श्रद्धा आणि सेवाभावाचा सुंदर संगम आज पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. अहिल्यानगरचे ग्राम दैवत व आराध्य दैवत श्री विशाल गणपती बाप्पांना त्यांच्याकडून अर्पण केला जात असलेला हा अस्सल सोन्यातून घडविलेला सुवर्ण अलंकार हिरा/माणिक जड़ित त्रिपुण्ड्र त्रिशूल/शक्ति तिलक केवळ एक अलंकार नाही, तर त्यांच्या अढळ श्रद्धेचा, उदात्त भावनेचा आणि विशाल दातृत्वाचा प्रतीक आहे.
श्री विशाल गणपती बाप्पांच्या चरणी अर्पण केलेली ही सेवा त्यांच्या व त्यांच्या संपूर्ण बोरा परिवाराच्या जीवनात सुख, समृद्धी, समाधान आणि अखंड पुण्य घेऊन येवो, हीच मनःपूर्वक प्रार्थना
विनीतजी, आपल्या या सेवाभावी कार्याला मनःपूर्वक सलाम !
विनीत बोरा
एक दानशूर एवं सेवाभावी व्यक्तित्व
विनीत बोरा मित्र परिवार
संजय बोगावत । पवन झंवर । गोपाल मालू । वरूण चोपड़ा । चिराग मेहता । आनंद काळे
रोहन मुथा (पुणे) । योगेश बजाज (पुणे) । निखिल शिंगवी (पुणे) । अमित झंवर (पुणे)

दर्जेदार व माफक दरात फ्लेक्स प्रिंटींग
संपर्क : 9403232323

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com


# परजिल्ह्यातील अवैध-स्क्रॅप रिक्षांवर त्वरित कारवाई करा, परवानाधारक रिक्षांवरच कारवाई होत असल्याचा आरोप

## पासिंगसाठी तीन महिन्यांची मुदत देण्याची मागणी, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक यांना रिक्षा पंचायतीचे निवेदन

नगर – अहिल्यानगर शहरात व जिल्ह्यात परजिल्ह्यातून आलेल्या प्रायव्हेट, स्क्रॅप तसेच विनापरवाना (बिगर परमीट) धावणाऱ्या रिक्षांवर कारवाई न करता केवळ परवानाधारक (परमीटधारक) रिक्षाचालकांवरच आरटीओ आणि शहर वाहतूक शाखा रिक्षा जप्त करून दंडात्मक कारवाई करत असल्याचा तीव्र संताप रिक्षा संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे. यासंदर्भात 'अहमदनगर जिल्हा रिक्षा पंचायत' आणि 'प्रजा चालक-मालक संघटना' यांच्यासह अन्य रिक्षा संघटनांच्या वतीने शहर वाहतूक शाखेच्या पोलीस अधीक्षक तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी प्रजा चालक-मालक रिक्षा संघटनेचे ज्ञानेश्वर बारस्कर, उपाध्यक्ष भैय्या पठाण, अहमदनगर जिल्हा रिक्षा पंचायतचे समीर कुरेशी, कार्याध्यक्ष गुलाम दस्तगीर, सचिव विष्णू आंबेकर, शाकीर पठाण, कलीम पठाण, अभय पतंगे, हाजी फैरोज शेख, विजू शेलार, निर्मल गायकवाड, गणेश आखमोडे, विशाल खांडरे, अन्वर शेख, जावेद शेख, फुजेल कुरेशी, शकील शेख आदीसह रिक्षा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



परजिल्ह्यातील अवैध-स्क्रॅप रिक्षांवर कारवाई करुन पासिंगसाठी ३ महिन्यांची मुदत देण्यात यावी, या मागणीचे निवेदन वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक यांना देताना रिक्षा संघटनेचे पदाधिकारी आदी.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, गेल्या काही दिवसांपासून आरटीओ आणि वाहतूक पोलिसांच्या माध्यमातून ऑटो रिक्षांवर तपासणी व कारवाई सत्र सुरू आहे. मात्र, या कारवाईत बाहेर जिल्ह्यांतून आलेल्या MH 12 (पुणे), MH 15 (नाशिक), MH 14 (पिंपरी-चिंचवड), MH 17 (श्रीरामपूर/अहिल्यानगर उत्तर) आणि MH 20 (छत्रपती संभाजीनगर) या सिरीजच्या प्रायव्हेट आणि स्क्रॅप झालेल्या गाड्यांवर कसलीही कारवाई केली जात नाही. उलट, नियमांचे पालन करणाऱ्या स्थानिक परवानाधारक रिक्षांवरच सतत कारवाईचा बडगा उचलला जात असल्याने रिक्षाचालकांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे.

### पासिंगसाठी ३ महिन्यांची मुदत द्यावी

कायदेशीर परवानाधारक रिक्षांना आपल्या वाहनांचे पासिंग (फिटनेस प्रमाणपत्र) करून घेण्यासाठी प्रशासनाने ३ महिन्यांचा अतिरिक्त कालावधी (मुदत) द्यावा, अशी मुख्य मागणी संघटनांनी केली आहे. या ३ महिन्यांच्या कालावधीत संघटना स्वतः पुढाकार घेऊन सर्व परवानाधारक रिक्षांचे पासिंग पूर्ण करून घेईल, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

बाहेरच्या जिल्ह्यांतील MH 12, MH 14, MH 15, MH 17, MH 20 क्रमांकाच्या स्क्रॅप आणि प्रायव्हेट रिक्षा शहरात बेकायदेशीरपणे वाहतूक करत आहेत. परवानाधारकांना त्रास: स्क्रॅप गाड्या सोडून नियमित परमीट असलेल्या रिक्षाचालकांनाच लक्ष केले जात असल्याचा आरोप करण्यात आला असून पासिंग आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी ३ महिन्यांची मुदत देण्यात यावी, अशीही मागणी भैय्या पठाण यांनी केली आहे.

# वादळं टाळता येत नाहीत; पण मुळं मजबूत करता येतात



राजन कुटे

गुंतवणुकीच्या प्रवासात प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी घडेल, अशी अपेक्षा ठेवणं स्वाभाविक आहे. बाजार वाढावा, गुंतवणुकीला चांगला परतावा मिळावा, आर्थिक उद्दिष्टांच्या दिशेने प्रगती व्हावी आणि भविष्यात कोणतीही अडचण येऊ नये, असं प्रत्येक गुंतवणूकदाराला वाटत असतं.

पण आर्थिक आयुष्यात वादळं येणारच नाहीत, याची हमी कोणीही देऊ शकत नाही. बाजारातील घसरण, उत्पन्नातील बदल, अचानक येणारे खर्च, आरोग्याशी संबंधित गरजा किंवा कुटुंबातील बदल-यापैकी काहीही आपल्या नियोजनानुसार घडत नाही. प्रश्न असा नाही की वादळं येतील का. प्रश्न असा आहे की ती आली, तर आपली आर्थिक रचना त्यांना कितपत सामोरी जाऊ शकेल.

समजा, एखाद्या व्यक्तीने दरमहा ₹१०,००० गुंतवणूक सुरू केली आहे. दुसऱ्या व्यक्तीने दरमहा ₹२५,००० गुंतवणूक केली आहे. दोघेही नियमित गुंतवणूक करत आहेत. पण पहिल्या व्यक्तीकडे सहा महिन्यांच्या आवश्यक खर्चाइतकी बचत आहे, तर दुसऱ्या व्यक्तीला अचानक खर्च आला की गुंतवणूक मोडावी लागते. अशा वेळी केवळ गुंतवणुकीची रक्कम पाहून आर्थिक तयारीचा अंदाज घेता येत नाही.

मजबूत आर्थिक मुळं म्हणजे केवळ मोठी गुंतवणूक नव्हे. त्यात योग्य बचत, आवश्यक संरक्षण, स्पष्ट उद्दिष्टं, योग्य मालमत्ता-वाटप, कर्जाचं भान आणि परिस्थितीनुसार निर्णय बदलण्याची तयारी यांचा समावेश असतो. बाजार चांगला असताना ही रचना कदाचित फारशी जाणवत नाही. पण परिस्थिती बदलली की तिचं महत्त्व स्पष्ट होतं.

गुंतवणूकदाराने प्रत्येक वादळाचा अंदाज बांधण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा स्वतःची तयारी तपासणं अधिक महत्त्वाचं आहे. आपल्या पुढील काही वर्षांच्या गरजा स्पष्ट आहेत का? अचानक खर्च आला, तर गुंतवणूक मोडावी लागेल का? आपल्या पोर्टफोलिओमध्ये वाढीची क्षमता आणि स्थैर्य यांचा योग्य समतोल आहे का? कुटुंबातील इतर सदस्यांना आर्थिक रचनेची माहिती आहे का? अशा प्रश्नांची उत्तरं आर्थिक शिस्त अधिक मजबूत करतात.

वादळ आल्यानंतर मुळं मजबूत करण्यासाठी वेळ कमी पडू शकतो. म्हणूनच तयारी शांत काळात करावी लागते. बाजार वाढत असताना जोखीम समजून घेणं, उत्पन्न स्थिर असताना बचतीची सवय लावणं आणि परिस्थिती अनुकूल असताना आर्थिक रचनेचा आढावा घेणं-हीच खरी जोखीम व्यवस्थापनाची सुरुवात आहे.

बाजार आपल्या नियंत्रणात नाही. पण आपल्या निर्णयांची पद्धत, पैशांची रचना आणि भविष्यासाठीची तयारी आपल्या हातात असते. वादळं टाळता येत नाहीत; पण मुळं मजबूत असतील, तर त्यांचा सामना अधिक स्थिरपणे करता येतो.

आर्थिक सुरक्षितता म्हणजे वादळं कधीच येऊ नयेत असं नाही; ती आली तरी आपली मुळं टिकून राहावीत, अशी तयारी असणं होय.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# गणेशोत्सवातील महाप्रसाद आणि भोजनासाठी व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर बंधनकारक

नगर – आगामी गणेशोत्सव तसेच अन्य सार्वजनिक उत्सवांमध्ये विविध मंडळांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या महाप्रसाद व भोजनासाठी केवळ व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर रोखण्यासाठी तसेच संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी अहिल्यानगरच्या जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना याबाबत निर्देश दिले आहेत.

गणेश मंडळांकडून महाप्रसाद तयार करताना अज्ञानापोटी किंवा दुर्लक्षामुळे घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होण्याची शक्यता असते. मोठ्या प्रमाणात स्वयंपाक करण्यासाठी घरगुती सिलेंडरचा वापर धोकादायक ठरू शकतो. घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या वापराच्या पद्धती, बर्नर तसेच गॅसच्या दाबामध्ये फरक असल्याने मोठ्या भांड्यांमध्ये स्वयंपाक करताना घरगुती सिलेंडरचा वापर केल्यास अपघात होऊन जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक अथवा सार्वजनिक कारणासाठी बेकायदेशीर वापर केल्याचे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. अशा प्रकारच्या वापरामुळे दुर्घटना घडल्यास विमा संरक्षणाच्या दाव्यावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच अनुदानित घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर केल्याने शासनाच्या महसुलाचे नुकसान होते. त्यामुळे गणेश मंडळांसह सार्वजनिक कार्यक्रमांच्या आयोजकांनी नियमांचे पालन करून केवळ व्यावसायिक सिलेंडरचाच वापर करावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, सार्वजनिक गणेश मंडळे आणि अन्य संस्थांना मंडप, ध्वनी व्यवस्था किंवा महाप्रसादासाठी परवानगी देताना संबंधित प्रशासनाकडून महाप्रसादासाठी केवळ व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर करणे बंधनकारक राहील, ही अट परवानगीपत्रात स्पष्टपणे नमूद केली जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे परिपत्रक काढून सर्व गणेश मंडळांना याबाबत पूर्वसूचना देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांनी आपापल्या तालुक्यातील गणेश मंडळांना याबाबत सूचना देऊन नियमांची अंमलबजावणी करावी तसेच करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल तातडीने जिल्हा कार्यालयास सादर करावा, असे निर्देश हेमा बडे यांनी दिले आहेत.

याबाबत ग्राहक दक्षता कल्याण फाऊंडेशनचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष नितीन सोळंके म्हणाले, श्रीगणेशोत्सव हा आपला पवित्र आणि आनंदाचा सण आहे; मात्र महाप्रसाद तयार करताना सुरक्षेशी अजिबात तडजोड केली जाऊ नये. घरगुती आणि व्यावसायिक सिलेंडरची क्षमता तसेच बर्नरच्या प्रेशरमध्ये मोठा फरक असतो. मोठ्या भांड्यांसाठी घरगुती सिलेंडर वापरणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. जिल्हा प्रशासनाने आमच्या मागणीची दखल घेत हा कडक निर्णय लागू केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. सर्व गणेश मंडळांनी कायदा आणि सुरक्षेचे पालन करून केवळ व्यावसायिक सिलेंडरचाच वापर करावा, जेणेकरून बाप्पाचा उत्सव प्रत्येकासाठी सुरक्षित आणि आनंदाचा ठरेल, असे सोळंके म्हणाले.

# लोखंडी सत्तुरचा धाक दाखवून तरुणाला भरदिवसा लुटले

नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका तरुणाला लोखंडी सत्तुरचा धाक दाखवून त्याच्या खिशातील ५ हजार ६०० रुपयांची रोख रक्कम बळजबरीने लुटल्याची धक्कादायक घटना १८ सप्टेंबर रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास घडली. याप्रकरणी तिघांच्या विरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संतोष गोवर्धन पवार (वय ४०, रा. कासारमळा, मोरे वस्ती रोड, कापूरवाडी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे १८ सप्टेंबर रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास त्यांच्या मोटारसायकलवरून आलमगीरकडून मोरे वस्तीकडे जात होते. त्यावेळी आरोपींनी पाठीमागून विना नंबरच्या निळ्या रंगाच्या ऍक्सेस मोपेड गाडीवरून येऊन त्यांची गाडी अडवली.

आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि त्यांच्या गळ्याला लोखंडी सत्तुर लावून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीला खाली पाडून त्यांच्या पँटच्या खिशातील ५ हजार ६०० रुपयांची रोख रक्कम बळजबरीने काढून घेतली आणि घटनास्थळावरून पळ काढला.

या प्रकरणी संतोष गोवर्धन पवार यांच्या फिर्यादीवरून सनी शंकर निकाळजे, अभि वाघेला आणि विकी भालेराव (सर्व रा. भिंगार, अहिल्यानगर) या तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे व सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी पोलीस पथकासह घटनास्थळाला भेट दिली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# सागर साळवे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – तांगेगल्ली, नालेगाव येथील रहिवासी सागर जनार्दन साळवे (वय २७) यांचे १९ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे वडील, १ भाऊ, पत्नी, भावजय असा परिवार आहे.

# तपोवन रोड सुरू असलेल्या बेकायदेशीर गॅस रिफिलिंग सेंटरवर छापा

## २१ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नगर – घरगुती गॅस टाक्यांमधून कमर्शियल गॅस टाक्यांमध्ये बेकायदेशीरपणे गॅस रिफिलिंग करून त्याची विक्री करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. दक्षतानगर, तपोवन रोड परिसरात केलेल्या कारवाईत पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्या ताब्यातून तब्बल १३३ घरगुती व कमर्शियल गॅस टाक्या, दोन इलेक्ट्रिक मशीन, दोन इलेक्ट्रिक वजन काटे, चार छोटा हत्ती वाहने, एक बोलेरो पिकअप, एक ओमिनी कार, हिट गन मशीन, ३० गॅस टोपण व प्लास्टिक लेबल असा एकूण २१ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



अवैध गॅस रिफिलिंगवर कारवाई करताना पोलीस अधिकाऱ्यांचे पथक.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे तसेच पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, प्रताप देवकाते, मनोज साखरे आणि अमोल कोतकर यांचे पथक तयार करून कारवाईच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यान, १८ सप्टेंबरला हे पथक तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांची माहिती घेत असताना दक्षतानगर, तपोवन रोड येथे किरण संतोष गलांडे याच्या मालकीच्या गाळ्याच्या पाठीमागील मोकळ्या जागेत घरगुती वापराच्या गॅस टाक्यांमधून कमर्शियल गॅस टाक्यांमध्ये गॅस रिफिलिंग करून त्याची विनापरवाना विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीची पंचांसमक्ष खातरजमा करून पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी दोन इसम घरगुती गॅस टाकीला इलेक्ट्रिक मोटार जोडून ती वजन काट्यावर ठेवून गॅस रिफिलिंग करताना आढळून आले.

पोलिसांनी परवाना व व्यवसायाबाबत विचारणा केली असता संबंधितांकडे कोणताही परवाना नसल्याचे समोर आले. या कारवाईत कल्ला रघुराज सिंग (वय २४, रा. गजानन कॉलनी, एमआयडीसी, बोल्हेगाव, ता. अहिल्यानगर) व गौरव राजेंद्र आढाव (वय ३४, रा. आढाववाडी, पिंपळगाव माळवी, ता. अहिल्यानगर) यांना ताब्यात घेण्यात आले. ताब्यातील आरोपींकडे व्यवसायाच्या मालकीबाबत चौकशी केली असता, सदर व्यवसाय किरण संतोष गलांडे (रा. दक्षतानगर, तपोवन रोड, अहिल्यानगर) याच्या मालकीचा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रिफिलिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या घरगुती गॅस टाक्या नितीन कदम (पूर्ण नाव माहिती नाही, रा. पाईपलाईन रोड, अहिल्यानगर) याच्याकडून खरेदी केल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. किरण संतोष गलांडे आणि नितीन कदम हे दोघेही फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पंचांसमक्ष करण्यात आलेल्या जप्तीत भारत गॅस कंपनीच्या ५६ भरलेल्या घरगुती व ४६ भरलेल्या कमर्शियल गॅस टाक्या, दोन रिकाम्या घरगुती गॅस टाक्या, एचपी गॅस कंपनीच्या २३ भरलेल्या घरगुती, तीन भरलेल्या कमर्शियल व तीन रिकाम्या कमर्शियल गॅस टाक्या, तसेच दोन इलेक्ट्रिक मशीन, दोन इलेक्ट्रिक वजन काटे, चार छोटा हत्ती वाहने, एक बोलेरो पिकअप, एक ओमिनी कार, गॅस टाकीला सील बसविण्यासाठी वापरण्यात येणारे हिट गन मशीन, ३० गॅस टोपण आणि प्लास्टिक लेबल असा २१ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींना जप्त मुद्देमालासह तोफखाना पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात जीवनावश्यक वस्तू अधिनियम व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध सुरू असून, या बेकायदेशीर गॅस रिफिलिंग व्यवसायामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदारांनी केली.

# कमलेश गुगळे यांचे दु:खद निधन

नगर – माणिक चौकातील रहिवासी कमलेश मनसुखलाल गुगळे (लोहसरवाला) (वय ५४) यांचे १९ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे चुलते, ३ भाऊ, भावजय असा परिवार आहे. रमेश गुगळे यांचे पुतणे, प्रविण, संजय, निलेश यांचे बंधू होत. श्रेणीक कॉर्नरचे ते संचालक होत.

# प्रदीप साठे यांचे अल्प आजाराने निधन




नगर – कोठी येथील रहिवाशी प्रदीप किसन साठे (वय ४३) यांचे ७ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. सिद्धार्थनगर येथील दफनभूमीत त्यांचा अंतिम विधी करण्यात आला.

त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, आई, वडील, व दोन भाऊ होते.

भूमी अभिलेख खात्यातील सेवानिवृत्त जिल्हा अधीक्षक

# गंगाधर झरेकर यांचे निधन

नगर – अहिल्यानगर येथील रहिवासी गंगाधर लहानु झरेकर (वय ८१, मुळ गाव कान्हूर पठार, ता. पारनेर) यांचे १५ सप्टेंबर रोजी निधन झाले.



भूमी अभिलेख कार्यालयातून ते जिल्हा अधीक्षक पदावरून सेवानिवृत्त झाले होते. राज्यभरात भूमी अभिलेख खात्यात कार्यरत राहून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला. त्यांनी प्रामाणिकपणाचा व कडक शिस्तीचा आदर्श समाजासमोर ठेवला.

अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. गणेश झरेकर यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, ३ मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# गणेश विसर्जन मार्गावरील वीजवाहिन्या भूमिगत करा

नगर – गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान संभाव्य विद्युत अपघात टाळण्यासाठी शहरातील प्रमुख विसर्जन मार्गावरील वीजवाहिन्या आणि आवश्यक केबल्स भूमिगत करण्याची मागणी स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे केली आहे. विशेषतः रामचंद्र खुंट, आडतेबाजार, डाळमंडई ते तेलीखुंट कोपऱ्यापर्यंतच्या मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या वीजवाहिन्या भूमिगत करण्याची कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नगर शहरात गणेशोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जात असून, शहरातील मानाचे १२ गणपती मंडळे आकर्षक आरास आणि देखाव्यांसह विसर्जन मिरवणुकीत सहभागी होत असतात. ही मिरवणूक पाहण्यासाठी शहर, उपनगर तसेच ग्रामीण भागातून नागरिक शहरात येतात. गणेश विसर्जन मिरवणूक रामचंद्र खुंट, डाळमंडई, तेलीखुंट, कापड बाजार, भिंगारवाला चौक, अर्बन बँक, नवीपेठ रोड, नेता सुभाष चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्लीगेट वेस, नेप्ती नाका आणि बाळाजी बुवा विहीर या मार्गावरून काढण्यात येते.

मिरवणुकीदरम्यान मोठ्या उंचीचे रथ, देखावे आणि गणेशमूर्ती सहभागी होत असल्याने मार्गावरील वीजवाहिन्या तसेच लोंबकळणाऱ्या तारांमुळे अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर वीजवाहिन्यांचा स्पर्श होऊन गंभीर विद्युत अपघात घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. मिरवणूक पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उपस्थित राहत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब गांभीर्याने घेण्याची गरज असल्याचे सुभाष लोंढे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

गणेश विसर्जन मिरवणूक मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या वीजवाहिन्या आणि आवश्यक केबल्स भूमिगत करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी. तसेच या कामासाठी चांगल्या दर्जाच्या अंडरग्राउंड केबलचा वापर करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे मिरवणुकीदरम्यान होणारे संभाव्य विद्युत अपघात टाळण्यास तसेच नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यास मदत होणार आहे.

महापालिकेच्या विद्युत विभागाने महावितरण कंपनीच्या समन्वयाने संपूर्ण गणेश विसर्जन मार्गाची पाहणी करून आवश्यक तांत्रिक कार्यवाही पूर्ण करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. विशेषतः रामचंद्र खुंट, आडतेबाजार, डाळमंडई ते तेलीखुंट कोपऱ्यापर्यंतच्या मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या वीजवाहिन्या भूमिगत करण्यासाठी तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# बँकेने सील केलेल्या मिळकतीचा घेतला बेकायदेशीर ताबा; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – बोल्हेगाव परिसरात कोर्ट कमिशनरमार्फत सील करण्यात आलेल्या मिळकतीचे सील व कुलूप तोडून या मिळकतीत जबरदस्तीने प्रवेश करत ताबा घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पती पत्नी विरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत डीसीबी बँकेचे व्यवस्थापक दिलीप शेलार (वय ३९, रा. गायकवाडमळा, बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गांधी नगर परिसरातील उभा मारुती जवळ असलेल्या एका प्लॉटची मिळकत न्यायालयाच्या आदेशानुसार व दोन पंचांसमक्ष सील करून डीसीबी बँकेचे व्यवस्थापकांच्या ताब्यात देण्यात आली होती. मात्र, काही दिवसांनी आरोपींनी त्या मिळकतीचे लॉक, सील आणि कडी-कोयंडा तोडला. तसेच नुकसान करून त्या ठिकाणी बेकायदेशीरपणे गृह अतिक्रमण केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

याप्रकरणी पोलिसांनी दशरथ महादेव कापडे, अश्विनी दशरथ कापडे (दोघे रा. उभा मारुती जवळ, गांधीनगर, बोल्हेगाव) यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२९ (४), ३२४ (४) प्रमाणे गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास तोफखाना पोलीस करत आहेत.


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### वयानुसार रक्तदाब किती असावा

प्रत्येक माणसाचा रक्तदाब त्याच्या वय, वजन, कामाचा व्याप आणि जीवनशैलीनुसार बदलत असतो. लहान मुलांमध्ये रक्तदाब कमी असतो आणि जसे वय वाढते तसा तो हळूहळू वाढत जातो. वयाच्या वीस ते पंचवीस वर्षापर्यंत वरचा दाब शंभर ते एकशे वीस आणि खालचा दाब सत्तर ते ऐंशी असणे उत्तम लक्षण आहे. या वयात शरीरातील रक्तवाहिन्या मऊ आणि लवचिक असतात त्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होतो. पंचवीस ते पस्तीस या वयात कामाचा ताण, जागरण आणि खाण्यापिण्याच्या सवयीमुळे दाब थोडा वाढू लागतो. अशावेळी वरचा दाब एकशे वीस ते एकशे तीस आणि खालचा दाब ऐंशी ते पंच्याऐंशी या दरम्यान राहिला तर काळजी करण्याचे कारण नाही. पस्तीस ते पंचेचाळीस हे वय अधिक जबाबदारीचे असते. या काळात वरचा दाब एकशे तीस ते एकशे पस्तीस आणि खालचा दाब पंच्याऐंशी ते नव्वद पर्यंत गेला तरी तो वयानुसार योग्य समजला जातो. पंचेचाळीस ते साठ वर्षामध्ये शरीरात अनेक बदल होतात. रक्तवाहिन्यांमध्ये थोडा कडकपणा येतो. त्यामुळे वरचा दाब एकशे पस्तीस ते एकशे चाळीस आणि खालचा दाब नव्वदच्या आसपास राहणे अपेक्षित असते. त्याचप्रमाणे वरचा दाब नव्वदपेक्षा कमी आणि खालचा दाब साठपेक्षा कमी होणे हे देखील कमी दाबाचे लक्षण आहे. त्यामुळे केवळ वयावरून स्वतःचा दाब योग्य आहे असे ठरवू नये. सकाळी उठल्यावर शांत बसून, दोन वेळा तपासणी करून सरासरी काढावी. जर छातीत धडधडणे, डोके दुखणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसली तर त्वरित जवळच्या दवाखान्यात जाऊन वैद्यकीय तपासणी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

## गणेशोत्सव स्पेशल पाककला

### स्ट्रॉबेरी मोदक

**साहित्य :** मिल्क पावडर १ वाटी, कंडेन्स्ड मिल्क १/२ वाटी, ताजी स्ट्रॉबेरी ६-७ मध्यम, स्ट्रॉबेरी क्रश २ चमचे, तूप १ चमचा, पिठी साखर २ चमचे, गुलाबी खायचा रंग १ चिमूट, वेलची पावडर १/४ चमचा, सजावटीसाठी बारीक चिरलेली स्ट्रॉबेरी १ चमचा

**कृती :** स्ट्रॉबेरी धुवून बारीक वाटून घ्या. कढईत तूप गरम करा. त्यात मिल्क पावडर आणि कंडेन्स्ड मिल्क घालून मिश्रण एकजीव करा. त्यात वाटलेली स्ट्रॉबेरी, स्ट्रॉबेरी क्रश, पिठी साखर आणि गुलाबी रंग घालून मंद आचेवर सतत ढवळत राहा. मिश्रण घट्ट होऊन कढई सोडू लागले की त्यात वेलची पावडर घाला आणि गॅस बंद करा. मिश्रण थोडे कोमट झाल्यावर हाताला तूप लावून मोदक साच्यात घालून मोदक बनवा. वरून चिरलेली स्ट्रॉबेरी लावून सजवा. तयार मोदक फ्रीजमध्ये १ तास ठेवून थंड सर्व्ह करा.

## वास्तू

### सतत आजारपण येत असेल तर...

✻ सतत आजारपण येत असेल तर घराच्या मध्यभागी (ब्रह्मस्थान) जड सामान, डस्टबिन, पलंग ठेवू नका. मोकळे ठेवा. ईशान्य कोपरा नेहमी स्वच्छ आणि हलका ठेवा. तिथे पाण्याचा माठ किंवा तुळस ठेवा.

✻ नैऋत्य दिशेला टॉयलेट असेल तर आजारपण वाढते. तिथे मीठाच्या पाण्याने फरशी पुसत जा.

## सौंदर्य

सकाळी चेहरा धुतल्यावर एक बर्फाचा तुकडा सुती कापडात गुंडाळून १ मिनिट चेहऱ्यावर फिरवा. याने त्वचा घट्ट दिसते.

## सल्ला

✻ कडधान्य रात्रभर भिजवून ठेवा, सकाळी १० मिनिटात शिजते.

✻ कोणत्याही गोड पदार्थात १ चिमूट मीठ आणि खाऱ्या पदार्थात १ चिमूट साखर टाका, चव एकदम हॉटेलसारखी लागते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६

**भागवत सप्ताहारंभ, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, पू.षा.२८।३५, सूर्योदय ०६ वा. २१ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** घरात आनंदाचे वातावरण राहील. जुनी देणी वसूल होतील.

**वृषभ :** प्रवासात नवीन ओळख होईल. मनातील इच्छा पूर्ण होईल.

**मिथुन :** कामाचा व्याप वाढेल. कुटुंबाकडून चांगली बातमी मिळेल.

**कर्क :** नातेवाईकांची भेट होईल. हातात पैसा खेळता राहील.

**सिंह :** शत्रूवर विजय मिळेल. समाजात मान वाढेल.

**कन्या :** अचानक धनलाभ होईल. दिवस मजेत जाईल.

**तूळ :** वडिलोपार्जित मालमत्तेचा लाभ मिळेल. जोडीदाराची साथ मिळेल.

**वृश्चिक :** नवीन कामाची सुरुवात होईल. कीर्ती वाढेल.


**धनु :** धार्मिक कार्यात वेळ जाईल. मन प्रसन्न राहील.

**मकर :** व्यवसायात मोठा फायदा होईल. मुलांकडून आनंद मिळेल.

**कुंभ :** नोकरीत बढती मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**मीन :** मित्रांची मदत मिळेल. अडकलेले काम पूर्ण होईल.

## शब्दगंध क्र. ७५२० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) गोंधळ; गडबड; कल्ला; गदारोळ; गलका ४) स्वामी; पती; धनी; नवरा ६) एक सुगंधी गवत व त्याची मुळे ७) लहान मुलाच्या डोक्यावरचे मूळचे केस ९) पाकिस्तानातील एक प्रमुख शहर १०) गाय वगैरे जनावरांची विष्ठा ११) प्रणाम करण्यासाठी वापरला जाणारा एक शब्द १३) पाण्याचा बारीक प्रवाह; हत्याराची कापण्याची बाजू १४) वेगाने वाहणारी हवा; पवन १५) उंट हकणारा १७) खाद्यपदार्थाचा एखादा कण चुकून श्वासनलिकेत गेला असता येणारा जोराचा खोकला २०) विरजलेल्या दुधातले पाणी काढून त्यात मीठ वगैरे घालून केला जाणारा एक खाद्यपदार्थ २१) हॉस्पिटल; रुग्णालय २२) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ २३) वर्षाच्या बोलीने ठेवला जाणारा नोकर

**उभे शब्द :-** १) एक जंगली प्राणी; रानरेडा २) प्रेम; माया; लाड ३) विवाहातील एक विधी ४) हार; माला; डोंगराळ जमीन ५) सोपे नसलेले; अवघड ८) आशीर्वाद; नवरा मुलगा ९) वेस्ट इंडिज क्रिकेट संघाचा एक माजी कर्णधार तथा निवृत्त तडाखेबाज फलंदाज ब्रायन ++ १०) गुडघ्याच्या खालपर्यंत येणारा पुरुषाचा एक जाड अंगरखा ११) एक पक्षी; राघू; कीर; पोपट १२) महाराष्ट्रातील एक विभाग १३) एक मराठी आडनाव १६) माणसांतील श्रेष्ठ १८) मित्र; यार; दोस्त १९) 'आ' या अक्षरासाठी वापरले जाणारे चिन्ह; तिरळा २१) सकाळच्या वेळी गवताच्या पात्यावर दिसतात ते बाष्पीभवनापासून तयार झालेले जलबिंदू

### शब्दगंध क्र. ७५१९ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** वेळ सगळ्यांना मिळते, पण वेळेचे सोने करणारे थोडेच असतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### बर्फ पाण्यात तरंगतो पण खडा बुडतो?

बर्फ पाण्यात तरंगतो पण खडा बुडतो याचे कारण त्यांच्या वजनात नाही तर त्यांच्या आत असलेल्या पोकळीत आहे.प्रत्येक वस्तूला स्वतःचे वजन असते आणि त्याच बरोबर ती किती जागा व्यापते हे देखील महत्वाचे असते. जेव्हा एखादी वस्तू पाण्यात टाकतो तेव्हा पाणी तिला वर ढकलण्याचा प्रयत्न करते. जर वस्तू हलकी असेल आणि जास्त जागा व्यापत असेल तर पाण्याचा वर ढकलण्याचा जोर जास्त असतो आणि ती वस्तू तरंगते.बर्फ हा मुळात पाण्यापासूनच बनलेला असतो पण पाणी गोठल्यावर त्याच्या आत लहान लहान पोकळ्या तयार होतात. त्यामुळे बर्फाचा आकार वाढतो पण वजन तेच राहते. म्हणजेच बर्फ पाण्यापेक्षा हलका होतो. म्हणूनच तो पाण्यावर तरंगतो. खड्याच्या बाबतीत असे होत नाही. खडा आतून पूर्ण भरलेला आणि घट्ट असतो. त्यात अजिबात पोकळी नसते. त्यामुळे तो त्याच्या आकाराच्या तुलनेत खूप जड असतो. पाणी त्याला वर ढकलू शकत नाही आणि तो सरळ तळाशी जाऊन बसतो. म्हणूनच मोठे जहाज लोखंडाचे असूनही तरंगते कारण त्याचा आकार खूप मोठा असतो आणि आत खूप मोठी पोकळी असते पण लहानसा खडा मात्र बुडतो.


### मेहनतीचे फळ

एका गावात दोन शेतकरी होते रामा आणि शामा. दोघांकडे सारखीच शेते होती. पावसाळा सुरू झाला. रामा रोज पहाटे उठून शेतात जायचा. खणायचा, बी पेरायचा, तण काढायचा, पाणी द्यायचा. उन्हात घाम गळत असला तरी तो थांबत नसे.

लोक म्हणायचे अरे थोडा आराम कर, तो म्हणायचा मेहनत केल्याशिवाय पिक कसे येणार. शामा मात्र आळशी होता. तो म्हणायचा पाऊस पडेल, आपोआप पिक येईल. तो दिवसभर झाडाखाली झोपायचा. त्याच्या शेतात गवत वाढले, बी उगवलेच नाही. काही महिन्यांनी कापणीची वेळ आली. रामाच्या शेतात सोन्यासारखे पीक डोलत होते. पोतीच्या पोती धान्य भरले. शामाच्या शेतात फक्त गवत आणि काटे होते.शामा रामाकडे आला आणि म्हणाला तुझे शेत इतके चांगले कसे आले? रामा हसून म्हणाला मित्रा, नशिबापेक्षा घाम मोठा असतो. मी मेहनत केली म्हणून फळ मिळाले. शामाला आपली चूक कळली. पुढच्या वर्षी तो पण मेहनत करू लागला.

बोध - मेहनत कधीच वाया जात नाही, तिचे फळ नेहमी गोडच मिळते.

## आत्मशक्ति



### आत्म्याचे खरे स्वरुप

प्रेम घेण्याची अपेक्षा न करता प्रेम करू द्या. कारण, आम्ही इतरांना जे काही देतो, तेच आम्हालाही मिळते. क्षमा केली तर आम्हालाही क्षमा केली जाते, आणि मरणाला कवटाळूनच आम्ही अमर जीवनाचे धनी होतो. आत्मा प्रेमानेच वागतो. याचे सारे निर्णय प्रेमावर आधारीत असतात. आम्ही हे समजू शकतो की आमचे जीवन कोण चालवतो ? आम्ही कोणापासून प्रेरणा घेतो ? प्रेमापासून की काम, क्रोध, लोभ, मोह वा अहंकारापासून ? जर ह्या पाच दरोडेखोरांनी आपले रुप दाखविले. जर त्यांच्या प्रेरणेने आम्ही जगत असू तर, त्यांनी आत्म्यावर कुरघोडी केली आहे हे निश्चितच समजावे.गुरु ग्रंथसाहेबात आले आहे,

इसू देही अंदरी पंज चोर वसहि, कामु, क्रोधु, लोभु, मोहु, अहंकारा ।। (राग सोरठ, म ३, पृ-६०० ख्रिश्चनांच्या धर्मग्रंथ बायबल मध्ये लिहीले आहे, शरीरांतर्गत असलेले कामविषय उघड आहेत जसे व्यभिचार, घाणेरडी कामे, लुच्चेपणा, मूर्तिपूजा, जादूटोणा, वैर, कलह, मत्सर, क्रोध, फाटाफूट आणि नास्तिकता. द्वेष, मनस्वीपणा, लहरी कामे आणि इतरही गोष्टी आहेतच. ह्या सर्व गोष्टीबाबत मी सुरुवातीसच बजावित आहे आणि ह्याबाबत पूर्वीच सांगितले आहे की अशी कामे करणारे लोक परमेश्वराच्या राज्याचे वारस होणार नाहीत. (गलतियों ५, १९-२३) जेव्हा जेव्हा वाईट गोष्टीवर आम्ही विजय मिळवतो, त्यांच्या कचाट्यांतून आपली सुटका करून घेतो, तेव्हा तेव्हा आत्मा पुन्हा आमच्या शरीराला चालवणारा बनतो. सद्गुणांनी भरलेले जीवन जगू लागतो. आत्म्यावरील आवरणास मन कारणीभूत कसे ? मन, इंद्रियास वश झाले की ते सूक्ष्म आत्म्यास वश करते. आत्म्याजवळ

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

अभिप्राय देणं किंवा मत मांडणं हे टीका करण्यापेक्षा वेगळं आहे. अभिप्रायात कामाविषयी बोललं जातं. तर टीकेमध्ये, कृती करणाऱ्यावर हल्ला केला जातो. जेव्हा कोणी चूक करतं, तेव्हा त्या चुकीवर चर्चा करून पुढच्या वेळेस चांगलं कसं करता येईल हे आपण सांगू शकतो.

टीका करताना, याआधीही त्याने कशा चुकीच्या गोष्टी केल्या यावर आपण हल्ला करतो.टीका केल्याने, टीका होणाऱ्याची आणि करणाऱ्याचीही ऊर्जा कमी होते. टीका करणारा नाकारल्याच्या आणि संतापाच्या भावना निर्माण करतो, आणि 'त्यांनी माझं ऐकलं नाही तर?' अशी भीती त्याला वाटते.जर आपल्यामुळे कोणी दुखावलं गेलं तर आपले तरंग त्यांना आणि आपल्याला क्षीण बनवतात. आपण त्या गोष्टी लगेचच सोडवायला हव्यात जेणेकरून त्यांना बरं वाटेल आणि आपला बचाव होईल.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**डॉक्टर :** तुला कसला त्रास आहे?

**रुग्ण** - डोळ्याला धुरकट दिसतं.

**डॉक्टर** - मग मोबाईलची काच पुसत जा बाबा!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ जी-७ मध्ये किती देश आहेत?

- ७ देश (अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, जपान, कॅनडा, इटली)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - 'नवा दिवस-नवी सुरुवात'

दररोज रात्री झोपण्यापूर्वी अंथरुणावर बसुन, दोन्ही हात जोडुन, दोन्ही डोळे मिटवुन घेऊन परमेश्वर आणि निसर्गाप्रति, मी कृतज्ञता व्यक्त करतो- आजचा दिवस छान गेला म्हणून. तसेच दुसऱ्या दिवशी पहाटे उठल्यावर पुन्हा प्रार्थना करतो- एक नवा दिवस मला बहाल केलास ह्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच रात्री झोपण्यापूर्वी आणि पहाटे उठल्यावर, आपला अन्नदाता शेतकरी दादा, आपल्या भारतमातेचं रक्षण करणारे मिल्ट्री-फौजीभाई, समाजाचं स्वास्थ्य चांगलं ठेवणारे डॉक्टर्स, कायद्याने नागरिकांचं रक्षण करणारे पोलिसदल तसेच मित्र, नातेवाईक, परिचित, ज्ञात-अज्ञात सहकार्य करणारे, चांगलं असं सांगणारे-शिकवणारे ह्यांच्याप्रतिही कृतज्ञता व्यक्त करतो. नवा दिवस अर्थात नवीन सुरवात.

झोपेतुन उठताक्षणी चेहऱ्यावर स्मित असेल, मनात सकारात्मक विचार असेल तर संपूर्ण दिवस छान जातो. आपले देह धर्म उरकले. व्यायाम, प्राणायाम, मॉर्निंगवॉक झाल्यानंतर. स्नान झाल्यानंतर, आज दिवसभरात कोण-कोणती कामं प्राधान्य क्रमाने करावयाची आहेत हा क्रम लिहुन काढला तर छानच असेल. व्यवसाय असेल तर आज नेमकं काय करायचं आहे, खरेदी-विक्री विषयी लिहुन ठेवणं योग्य असेल. नोकरदार असेल तर अगदी प्राधान्याने कोणतं काम करावयाचं आहे, कोणत्या पत्रांना, ई-मेलला उत्तरं द्यायची आहेत? आज कोण-कोणत्या मिटिंग्ज आहेत. त्यांचे विषय ह्याविषयी मुद्दे लिहिले पाहिजेत. विद्यार्थी असाल तर गृहपाठ पूर्ण केला का? अवांतर वाचन काय करायचं? गणितं सोडवण्याचा सराव आणि इंग्लिश स्पेलिंग पाठांतर, पाढे लिहुन काढणे ह्यासह अनेक बाबींचा विचार लिहिला पाहिजे. सर्वात महत्वाचं म्हणजे त्या लिहिल्यानुसार तशी कृती केलीच पाहिजे. त्यांचा विचार गांभिर्याने करा ज्यांना हा आजचा नवा दिवस पाहायलाच मिळाला नाही. आपल्याला मिळालेला हा नवा दिवस अर्थात आज नव्यानं जगणं आहे, आजचा दिवस अर्थात हा नवा दिवस योग्य प्रकारे उपयोगात आणणं आहे.

या नव्या दिवशी ध्येय निश्चित केलं, एखादं चांगलं कार्य करण्यासाठी मनापासून सुरवात केली तर बरच काही साध्य होऊ शकणार आहे. असं म्हणतात-प्रत्येक दिवस हा नव्याने जगण्याची संधी असते. मग ह्या संधीचा उपयोग करणं आपल्याच हातात आहे. खरं तर चांगल्या कृती, चांगल्या ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठीची सुरवात कोणत्याही नव्या दिवशी आनंदाने, उत्साहाने करता येते. नवा दिवस आणि नवी सुरुवात ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. समजा झोपेतुन उठल्यावर एखाद्याला आजचा हा नवा दिवस मिळाला आणि तो दिवसभर काहीही न करता, आजारी नसतांनाही आरामात अंथरुणावर पडुन राहिला तर त्याचं भविष्य उज्ज्वल होऊ शकणार नाही. चांगला विचार, चांगल्या कृतीची लागलीच सुरवात करणं हे फक्त आणि फक्त आपल्याच हातात आहे. मनुष्य जीवन हे एकदाच मिळणारं आहे. मग मिळालेल्या नव्या दिवसाची नवी सुरवात लगेच करणं अत्यंत महत्वाचं आहे. चांगला विचार, चांगल्या कृतीची, ध्येयाच्या मार्गावर पहिलं पाऊल ठेवण्याची सुरवात करणार नसाल तर मग गांभिर्याने स्वतःविषयी विचार करायलाच पाहिजे.

सर्वात महत्वाचं म्हणजे नवा दिवस आपल्याला पाहायला मिळाला हे आपलं भाग्य आहे. मग ह्या भाग्याचा उपयोग, ह्या संधीचा उपयोग करणं दुसऱ्या कुणाच्याही हातात नाही. सकाळी झोपेतुन उठताक्षणी आपल्या नातेवाईक, परिचिताच्या निधनाची बातमी समजली तर आपल्याला वाईट वाटतं. लगेचच आपली मानसिकता नकारात्मक होते. एखाद्या दिवशी सकाळी झोपेतुन उठताक्षणी एखादी आनंदाची बातमी कळाली तर आपली मानसिकता चांगली होते. सकारात्मक, नकारात्मक ह्या मानवी मनाच्या अवस्था आहेत. नव्या दिवसाची नवी सुरवात सकारात्मक मानसिकतेनं केली तर आपण दिवसभर आनंदी, प्रसन्न राहातो, ऊर्जेनं अनेक कामं करतो. प्रत्येक नवा दिवस हा आनंदी, समाधानी, प्रसन्न कसा राहिल ह्याचा विचार करुन त्यानुसार पहिलं पाऊल उचललं तर सगळंच छान होईल. समजा नव्या दिवसाची नवी सुरवात एखाद्या अनपेक्षित संकटाने झाली तर आपल्याला वाईट वाटणं हे अगदी स्वाभाविक आहे पण ते संकट स्वीकारुन त्यावर मात कशी करायची ह्याचा विचार आणि तशी कृती महत्वाची आहे. संकटं आलीच पाहिजेत, दुःखाचा अनुभवसुद्धा घेतलाच पाहिजे. प्रत्येक क्षणी जीवन बदलत असतं.

प्रत्येक क्षणी आपण आनंदीच असु असं नसतं. पण आपण नव्या दिवसात नवी सुरवात आनंदी राहण्याचे करत असु तर तोच आनंद आपण दुसऱ्यांना दिलाच पाहिजे. एखाद्याला आनंदी करणं म्हणजेच त्या नव्या दिवसाचं हे यश म्हणता येईल. नवी चांगली सुरवात कोणत्याही क्षणी करता येते फक्त आपण हे मनापासून ठरवलं पाहिजे. नव्या दिवसाची सुरवात प्रसन्न चेहऱ्याने करायची की दुःखी चेहऱ्याने हे ज्यांन-त्यांन ठरवायचं. मी, माझ्या नव्या दिवसाची सुरवात प्रसन्न मनानेच करणार हे अगदी नक्की. तुमच्या नवीन दिवसाची, नवीन सुरवातीसाठी मनापासुन शुभेच्छा.

(लेख क्र.६१८)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### विवाह ठरल्यानंतर

यालाच वैद्यकीय भाषेमध्ये 'हनिमून सिस्टायटिस' असे म्हणतात. यावर डॉक्टरांचा सल्ला घेऊन औषधोपचार करावा. सुरुवातीला मनाची तयारी नसल्यामुळे योनीमार्ग विस्तारीत होत नाही. अशा वेळी समागम ही क्रिया नैसर्गिक आहे. एक वैवाहिक पवित्र संस्कार आहे. माझे गौरववर मनापासून प्रेम आहे ही भावना ठेवून योनीमार्ग आकुंचित न करता प्रसरण करावा. एखादे फूल उमलावे तसा हळूहळू योनीमार्ग उघडला जातो. पुरुषांचे शिश्नालादेखील शारीरिक जवळीकतेमुळे ताठरता येते. पुरुषांमधील शिश्नांमधून व स्त्रियांमधील योनीमार्गातून द्रव पाझरू लागतो. अशा वेळी योनीमार्गात शिश्न हळूहळू घातल्यानंतर समागम क्रिया व्यवस्थित पार पडते. सुरुवातीला त्रास वाटला तर योनीमार्गाला आतून व तोंडाशी लावल्यास घर्षणामुळे होणाऱ्या वेदना टाळता येतात. तुम्हाला प्रथम समागमानंतर काही त्रास झाल्यास मला परत भेटा,

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘श्री विशाल गणेश रिल्स बनवा’ विशेष स्पर्धेचे आयोजन

**गणेशमूर्ती, भक्तांची गर्दी आणि आकर्षक सजावटीचे चित्रीकरण करण्याची संधी; विजेत्यांना रोख बक्षिसे**

नगर – शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणेश मंदिर ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त ‘श्री विशाल गणेश रिल्स बनवा’ या विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवातील भक्तिमय वातावरण, श्री विशाल गणेशाची आकर्षक मूर्ती, भाविकांची गर्दी तसेच मंदिर परिसरातील सुंदर व आकर्षक सजावट यांचे कलात्मक चित्रीकरण करून ते एका मिनिटाच्या रिल्सच्या माध्यमातून सादर करण्याची संधी या स्पर्धेच्या माध्यमातून स्पर्धकांना मिळणार आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तरुणाईमधील रिल्स बनविण्याच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि श्री विशाल गणेश मंदिरातील उत्सवाचे वैभव आधुनिक माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी सांगितले.



ही स्पर्धा २०, २१ आणि २२ सप्टेंबर या तीन दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी जास्तीत जास्त एक मिनिटांचा व्हिडिओ तयार करणे अपेक्षित आहे. या व्हिडिओमध्ये श्री विशाल गणेशाची मूर्ती, मंदिरातील दर्शनासाठी आलेले भाविक, उत्सवातील भक्तिमय वातावरण तसेच परिसरात करण्यात आलेली आकर्षक सजावट यांचा समावेश असणे अभिप्रेत आहे. त्यामुळे केवळ व्हिडिओ तयार करण्याऐवजी गणेशोत्सवाचे धार्मिक, सांस्कृतिक आणि उत्सवी वातावरण आपल्या कल्पकतेने रिल्सच्या माध्यमातून मांडण्याची संधी स्पर्धकांना मिळणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकास ११ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ७ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकास ५ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. त्यामुळे रिल्स बनविण्याची आवड असलेल्या युवक–युवतींसह सर्व इच्छुकांसाठी ही स्पर्धा विशेष आकर्षण ठरणार आहे. आपल्या कल्पकतेला भक्तीची जोड देत श्री विशाल गणेशोत्सवाचे चित्रीकरण करण्याची ही अनोखी संधी उपलब्ध झाली आहे.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो सामाजिक, सांस्कृतिक आणि कलात्मक अभिव्यक्तीचेही माध्यम आहे. बदलत्या काळानुसार सोशल मीडिया हे उत्सवातील विविध उपक्रम लोकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर श्री विशाल गणेश मंदिर ट्रस्टने रिल्स स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धकांनी मंदिर परिसरातील शिस्त, पावित्र्य आणि धार्मिक वातावरणाचा आदर राखून व्हिडिओ तयार करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

श्री विशाल गणेशाच्या चरणी आपल्या कलागुणांची सेवा अर्पण करा आणि गणेशोत्सवाचे भक्तिमय क्षण आपल्या कल्पकतेने टिपा, असे आवाहन अभय आगरकर यांनी केले आहे. स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी होऊन श्री विशाल गणेशाच्या उत्सवाचे क्षण आपल्या कॅमेऱ्यात कैद करावेत आणि आपल्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून द्यावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी देवस्थान ट्रस्टने दिलेल्या ९६२३६७८५८७ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधून आपला सहभाग नोंदवावा. गणेशोत्सवातील भक्ती, उत्साह, सजावट आणि श्री विशाल गणेशाचे वैभव एका मिनिटाच्या प्रभावी रिल्समधून सादर करण्याची ही संधी असल्याने रिल्स क्रिएटर्स, युवक–युवती आणि छायाचित्रणाची आवड असणाऱ्या नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

**माझ्यामुळेच जगाला सुखाची हमी**




जो तो म्हणतो, शहाणा फक्त मी, बाकी वेड्यांची काय कमी ? माझ्यामुळेच जगाला सुखाची हमी. पण ही फुशारकी निकामी. असा माणूस वेडा ठरतो परिणामी, अरे माणसा, उपयोगी ठरलेले नीतिनियम मोडायचे. आपले तेवढे भले साधायचे. इतरांना वाऱ्यावर सोडायचे. जेव्हा जे करायचे तेव्हा ते टाळायचे. त्यातच आपले वेगळेपण मानायचे. विचारवंत म्हणून मिरवायचे. मग सगळ्या चांगल्या गोष्टींना नाव ठेवायच,

हे एक जगाचे गूढ कुणालाच कळत नाही. की मी मूढ. रात्र असते झोपण्यासाठी. मी वापरतो जगण्यापोटी. मग म्हणतो बापरे । रात्र केवढी मोठी ? वेडेवाकडे चालायचे, नको तेव्हा उड्या मारायचे. कारण नसता वेड्यासारखे धावायचे, मग फर्लांगभर अंतरही चालणे जड व्हायचे. उलट रस्ता वाईट म्हणून नाक मुरडायचे. तसेच या मूर्खाचे घडायचे. स्वतःला तेवढे शहाणे म्हणायचे. व्यक्ती सुधारायची तर हवी भक्ती. व्यक्ती सुधारली की समाजाला आली शक्ती. कारण व्यक्तीचा समूह हीच समाजाची अभिव्यक्ती. भक्ती साधते मुक्ती. सर्व सात्त्विक, सोज्वळ व मंगळ सद्भावनांची आकंठ तृप्ती. संत तुकाराम म्हणतात,

समाजाच्या सर्वांगीण प्रगतीची एकच युक्ती. प्रत्येकाने स्वतःला मुक्त करीत समाजाची साधायची मुक्ती. याच प्रक्रियेला म्हणायची भक्ती. ती रुळवा, रुजवा, लोकांना समजवा, मन लावून लोकोपयोगी विचार व वर्तन करायला शिकवा. मग कलियुगाचे यश कशाला? आता कुठले दुहीचे बीज ? सत्कर्माचे होईल चीज.

पंडित जवाहरलाल नेहरूंना आलेला अनुभव. ते एकदा बरेलीला गेले. बरेलीला एक मोठे वेड्यांचे इस्पितळ होते. मोठमोठे मानसशास्त्रज्ञ आणि हुशार असे डॉक्टर तिथे रोग्यांची काळजी घेत असत. नेहरूंची त्या इस्पितळात भेट ठरली. तीन वर्षापासून इस्पितळात असलेला वेडा आता बरा झाला म्हणून डॉक्टरांनी पंतप्रधान नेहरूंच्या हस्ते त्याला प्रमाणात देऊन घरी पाठवावे, असा विचार केला.

पंडित नेहरू आले. त्यांनी इस्पितळाभोवती फेरफटका मारला. सर्व वातावरण पवित्र वाटले. पंडितजी प्रसन्न झाले. मग ते सगळे मंचावर येऊन बसले. डॉक्टरांची पंडितजींनी प्रशंसा केली. माणूस हा वेडाच. त्याला बरे करणे कठीणच, असे वेदान्त सांगतो. पण या डॉक्टरांनी इथले अनेक वेडे बरे केले आहेत. ही गोष्ट खचितच समाधानाची व अभिमानाची आहे, असे पंडितजी आपल्या शैलीत बोलले.

मग ज्यावेड्याला पंडितजीच्या हस्ते प्रमाणपत्र द्यायचे होते. त्याला मंचावर बोलावण्यात आले. त्याचे नाव उच्चारले गेले, त्या वेड्याने पंडितजींना विचारले, आपले नाव काय ?

डॉक्टर दचकले. हा पंतप्रधानांना ओळख नाही? पण नेहरू किंचित स्मित करून म्हणाले, माझे नाव जवाहरलाल नेहरू. तो प्रश्न विचारणारा यावर मनापासून हसला आणि म्हणाला, घाबरू नका, हे डॉक्टर हुशार आहेत. तीन वर्षात तुम्ही बरे व्हाल. तीन वर्षापूर्वी मी देखील मला जवाहरलाल नेहरू समजत होतो. काय योगायोग पाहा, मी बाहेर जातो आहे आणि तुम्ही या इस्पितळात येत आहात. वेड्यांना कुणी दुरुस्त करावे ? प्रत्येकाने स्वत:च स्वत:चा डॉक्टर व्हावे.


– किशोर गांधी



**वृंदावनाच्या भगवान श्रीकृष्णचे प्रेम मंदिराचा देखावा**

दिल्लीगेट येथील सातभाई गल्ली मित्र मंडळाने वृंदावनाच्या भगवान श्रीकृष्णचे प्रेम मंदिराचा सुमारे ७० फुटी देखावा बनविला आहे,भव्य असे हे मंदिर दिल्लीगेट वेशीजवळून जाताना नजरेत भरते.

# हरिहरेश्वर मित्र मंडळाच्यावतीने २० सप्टेंबर रोजी मोठ्या स्क्रीनवर मोफत ‘हनुमान अंश’ चित्रपट




नगर – गणेशोत्सवानिमित्त बागरोजा हडको, दिल्ली गेट येथील श्री हरिहरेश्वर महादेव मंदिर परिसरात हरिहरेश्वर मित्र मंडळाच्या वतीने ‘हनुमान अंश’ हा चित्रपट मोठ्या स्क्रीनवर २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता दाखविण्यात येणार आहे.

नागरिक व भाविकांसाठी हा चित्रपट विनामूल्य दाखविण्यात येणार असून, परिसरातील नागरिकांनी चित्रपटाचा आनंद घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘स्कायब्रिज’मध्ये एकोप्याच्या गणेशोत्सवाचा उत्साह

**क्षमापनासह विविध कार्यक्रमांत रहिवाशांचा सहभाग**

नगर – बुरूडगाव रोडवरील स्कायब्रिज येथे सर्व रहिवासी उत्साहात गणेशोत्सव साजरा करत आहेत. दररोज वेगवेगळ्या रंगांची थीम, सर्वांना एकत्र आणणारे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम यामुळे येथील वातावरण प्रसन्न बनले आहे. श्रद्धा, भक्ती, संस्कार आणि आनंद यांचा सुरेख संगम येथे पहायला मिळत आहे.

प्रकल्पातील गणेशोत्सवाचे यंदा तिसरे वर्ष आहे. स्कायब्रिजचा राजा मोरयाची प्रतिष्ठापना केल्यानंतर याठिकाणी दररोज सकाळी, सायंकाळी आरती तसेच विविध कार्यक्रम होत आहेत. १६ सप्टेंबर रोजी गुलाबी रंगाची थीम आणि रात्री जैन धर्म परंपरेतील सामूहिक क्षमापना व सामूहिक भावा कार्यक्रम झाला. जैन धर्मात पर्युषण पर्व जप तप साधनेचे पर्व आहे. संवत्सरीला मानवतेचे पर्वही म्हणतात. मनुष्य जीवनात प्रत्येकाकडून कळत नकळत चुका होतात, कोणाचे मन दुखावले



जाते. या गोष्टींबद्दल सर्वांनी हृदयपूर्वक क्षमा याचना केली. १७ सप्टेंबर रोजी साऊथ इंडियन थीमनुसार सर्वांनी दक्षिण भारतीय वेशभूषा परिधान केली होती. रात्री झालेल्या म्युझिकल चेअर कार्यक्रमात सर्वांनी सहभाग नोंदवला. शुक्रवारी निळ्या रंगाची थीम व रात्री ग्रुप गेम्स झाले. सर्व कुटुंबीय यात सहभागी झाले होते. लहान मुलांसह मोठेही या उत्सवात हिरीरीने सहभाग नोंदवून एकोपा वृद्धिंगत करत आहेत.

शनिवारी इंडो वेस्टर्न ड्रेस थीम असून सायंकाळी फन फेअर होणार आहे. २० सप्टेंबर रोजी गुजराती घागरा/साडी आणि कुर्ता–पायजमा ड्रेस थीम, सत्यनारायण पूजा, सायंकाळी सामूहिक भोजन आणि किडस ग्रुप तंबोला, २१ सप्टेंबर रोजी ऑरेंज रंगाची थीम व रात्री ८.३० वाजता अंताक्षरी, २२ सप्टेंबरला पर्पल रंगाची थीम व रात्री ८.३० वाजता पेअर टॅलेंट हंट, २३ सप्टेंबर रोजी ग्रीन रंगाची थीम व रात्री ८.३० वाजता ट्रेझर हंट, २४ सप्टेंबरला फ्लोरल थीम, २५ सप्टेंबर रोजी निळ्या रंगाची थीम व दुपारी ४ नंतर गणेश विसर्जन कार्यक्रम होईल.

# वराह पुराणातील विचित्र गणेश

**कार्यात विघ्न निर्माण करणारा गणेश**



सामान्यतः संपूर्ण विश्वात गणपती बाप्पाची ओळख ‘विघ्नहर्ता’ म्हणजेच सर्व संकटे आणि अडचणी दूर करणारा देव अशीच आहे. परंतु आपल्या अठरा महापुराणांपैकी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या ‘वराह पुराणात’ भगवान श्रीगणेशाची एक अत्यंत आगळीवेगळी, विस्मयकारक आणि विचारप्रवृत्त करणारी कथा आढळते.

या पुराणात गणपती हे केवळ विघ्न हरणारे नाहीत, तर ते सुरुवातीला ‘विघ्नकर्ता’ म्हणजेच लोकांच्या कार्यात अडथळे निर्माण करणारे म्हणून प्रगट झाले आहेत. महादेवाने त्यांना एका अद्वितीय हेतूसाठी जन्म दिला आणि त्यांच्या अतिसुंदर रूपाचे रूपांतर नंतर ’विचित्र’ रूपात झाले. ही कथा बाह्यतः जितकी रंजक वाटते, तितकेच यामागे सृष्टीचे संतुलन राखणारा एक श्रेष्ठ विचार दडलेला आहे.

वराह पुराणातील २३ व्या अध्यायातील संदर्भानुसार, एका अत्यंत प्राचीन युगात पृथ्वीवर अशी स्थिती निर्माण झाली होती की कोणतेही चांगले वा वाईट कृत्य करताना जीवाला कसलीही बाधा येत नव्हती. नियम, धर्म अथवा अंतःकरणाची शुद्धता नसतानाही केवळ हट्टाच्या जोरावर असुर, राक्षस आणि दुष्ट प्रवृत्तीचे लोकही उग्र तपश्चर्या करत असत.

मार्गात कसलेही अडथळे नसल्यामुळे पापी व्यक्तींनाही तपश्चर्येचे फळ सहज प्राप्त होऊ लागले. त्या जोरावर हे असुर थेट स्वर्गाचे सिंहासन बळकावू लागले. सत्कर्म आणि दुष्कर्म यांमधील सीमारेषाच पुसट झाली. स्वर्गात पुण्यात्म्यांपेक्षा अधर्मी शक्तींचा वावर वाढल्याने संपूर्ण विश्वाचे संतुलन धोक्यात आले.

या समस्येवर उपाय शोधण्यासाठी देवराज इंद्रासह सर्व देवता कैलासावर भगवान महादेवांच्या चरणी पोहोचल्या. त्यांनी महादेवांना विनंती केली की, जगात पुण्यात्मा कोण आणि पापात्मा कोण याची परीक्षा घेणारी कोणतीही व्यवस्था शिल्लक राहिलेली नाही. सत्कर्म करताना माणसाच्या संयमाची, निष्ठेची आणि हेतूची पारख झाली पाहिजे. अयोग्य आणि अहंकारी व्यक्तींच्या मार्गात अडथळे उभे करणारी, म्हणजेच त्यांच्या दुष्कृत्यांमध्ये ‘विघ्न’ आणणारी एखादी स्वतंत्र ईश्वरी शक्ती निर्माण झाली पाहिजे.

देवांची ही चिंता ऐकून भगवान शंकर ध्यानस्थ झाले. त्यांनी आकाशाकडे म्हणजेच ‘ख–तत्त्वा’कडे पाहिले. त्यांच्या मुखावर एक अद्भूत, प्रसन्न हास्य उमटले. त्या हास्यातून आणि महादेवांच्या अलौकिक ईश्वरीय तेजातून एका अत्यंत तेजस्वी, सुंदर आणि सर्व लक्षणांनी युक्त अशा तरुणाचा जन्म झाला.

तो बालक इतका देखणा आणि मनमोहक होता की त्याच्या अंगातून निघणाऱ्या कांतीने संपूर्ण कैलास उजळून निघाला. स्वर्गातील अप्सरा, गंधर्व आणि सर्व उपस्थित शक्ती त्याच्या अनुपम सौंदर्याकडे एकटक पाहू लागल्या.

तो बालक अत्यंत देखणा असल्याने सर्व जण त्याच्या बाह्य सौंदर्याच्या मोहात पडू लागले. हे दृश्य पाहून तिथे उपस्थित असणाऱ्या माता पार्वतीच्या मनात विचार आला की, हे बाह्य सौंदर्य केवळ आकर्षण, काम आणि मोह निर्माण करत आहे. ज्या शक्तीला विश्वातील दुष्प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवायचे आहे, तिच्याकडे जर केवळ भुलवणारे बाह्य सौंदर्य राहिले, तर विश्वात केवळ आसक्तीच पसरेल.

त्यामुळे त्या देखण्या रूपाचा अहंकार किंवा आसक्ती नष्ट व्हावी आणि त्या शक्तीने गंभीर, स्थिर रूप धारण करावे यासाठी त्या बालकाला गजमुख, लंबोदर आणि कमरेला सर्प वेढलेले असे ‘विचित्र’ स्वरूप प्राप्त झाले. त्याचे ते बाह्य, नाजूक रूप क्षणात एका महाकाय, गंभीर आणि हत्तीचे मस्तक असलेल्या गजानन रूपात परावर्तित झाले. हे रूप बाह्य दृष्टीने विचित्र वाटत असले, तरी ते ज्ञानाचे आणि विशालतेचे साक्षात अधिष्ठान बनले.

त्यानंतर साक्षात भगवान महादेवांनी त्या बालकाला विश्वातील सर्व गणांचा अधिपती म्हणजेच ‘गणेश’ आणि सर्वांचा नायक म्हणजेच ‘विनायक’ असे नाव दिले. महादेवांनी त्याच्यावर विश्वाचे अत्यंत महत्त्वाचे दायित्व सोपवले.

महादेवांनी स्पष्ट केले की, यापुढे विश्वात जे लोक गर्वाने, कपटाने, दुसऱ्याचे अहित करण्याच्या हेतूने किंवा धर्मबाह्य मार्गाने यज्ञ, तप अथवा कोणतीही कामे सुरू करतील, त्यांच्या मार्गात ही शक्ती प्रत्यक्ष ‘विघ्नकर्ता’ बनून अडथळे आणेल. जोपर्यंत माणसाचा अहंकार गळून पडत नाही, तोपर्यंत त्याचे कार्य पूर्ण होणार नाही. परंतु, जे साधक अंतःकरणाच्या शुद्धतेने, नम्रतेने आणि कल्याणाच्या भावनेने कार्य सुरू करतील आणि कार्याच्या आरंभी या आद्य तत्त्वाला वंदन करतील, त्यांची सर्व संकटे दूर करून हीच शक्ती ‘विघ्नहर्ता’ म्हणून त्यांचे कार्य सिद्धीस नेईल.

जर जीवनात कोणत्याही प्रयत्नाशिवाय आणि पात्रतेशिवाय यश मिळाले, तर माणसाला त्या यशाची किंमत राहत नाही. वाईट माणसाच्या हाती सहज सत्ता किंवा सिद्धी गेली, तर विनाश अटळ असतो. म्हणूनच परमेश्वराने ‘विघ्न’ निर्माण केले, जेणेकरून माणसाच्या धैर्याची आणि शुद्धतेची परीक्षा घेता येईल. आपल्या कामात जेव्हा वारंवार अडचणी येतात, तेव्हा समजून घ्यावे की ईश्वराने आपल्या अहंकाराला थांबवण्यासाठी ती विघ्ने आणली आहेत. जेव्हा आपण नम्र होतो, तेव्हा तेच विघ्न नाहीसे होऊन यशाचा मार्ग मोकळा होतो.

भगवान गणेश हे केवळ संकटे दूर करणारे नाहीत, तर चुकीच्या मार्गावर जाणाऱ्या माणसाला अडवणारे संरक्षकही आहेत.


।। गणपती बाप्पा मोरया,
मंगलमूर्ती मोरया ।।



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६

# नगरच्या अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारात २१ सप्टेंबर रोजी ‘गुरुपुरब सोहळ्याचे’ आयोजन

**तारकपूर येथे शेड व फरशी कामाचे लोकार्पण; लोकप्रतिनिधींसह सहकार्य करणाऱ्यांचा सत्कार**



नगर – तारकपूर येथील अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारा येथे बाबा श्रीचंद महाराज गुरुपुरबनिमित्त २० आणि २१ सप्टेंबर रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय सोहळ्यात आरती, गुरबाणी कीर्तन, शब्द, आनंद साहेब, अरदास, हुकमनामा तसेच गुरू का लंगर आदी कार्यक्रम होणार आहेत.

बाबा श्रीचंद महाराज हे श्री गुरु नानक देव जी यांचे ज्येष्ठ सुपुत्र असून उदासी परंपरेचे संस्थापक म्हणून त्यांचे स्मरण केले जाते. उपलब्ध ऐतिहासिक स्रोतांनुसार त्यांचा जन्म ८ सप्टेंबर १४९४ रोजी सुलतानपूर लोधी येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना अध्यात्म, योग, साधना आणि वैराग्याची ओढ होती. पुढे त्यांनी उदासी परंपरेच्या माध्यमातून अध्यात्मिक विचारांचा प्रसार केला.

बाबा श्रीचंद महाराजांनी विविध प्रदेशांत भ्रमण करून अध्यात्म, ज्ञान, साधना आणि मानवकल्याणाचा संदेश दिल्याची परंपरा आहे. त्यांच्या परंपरेशी संबंधित अनेक डेरे, आश्रम, गुरुद्वारे आणि धार्मिक केंद्रे पुढे देशाच्या विविध भागांत निर्माण झाली. त्यांच्या जीवनाशी संबंधित बारठ साहिबसह अनेक स्थळांना आजही धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. अहिल्यानगरमधील अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारा हा या आध्यात्मिक परंपरेचा वारसा जपणारे श्रद्धास्थान आहे. गुरुपुरबच्या निमित्ताने गुरुद्वारा परिसरात भाविकांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या शेड व फरशीच्या कामाचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

या कामासाठी डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निधीतून सहकार्य लाभले आहे. या कार्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच गुरुद्वाराच्या विकासासाठी सहकार्य व पाठबळ दिल्याबद्दल आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, नगरसेविका हरप्रीतकौर गंभीर, मोहित पंजाबी आणि गौरी अमित बोरकर यांचाही सत्कार करण्यात येणार आहे.

रविवारी सकाळी १०.३० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत दीवान कार्यक्रम. दुपारी १२.०० वाजता बाबा श्रीचंद महाराज जी यांची आरती. आरतीनंतर शब्द, आनंद साहेब, अरदास, हुकमनामा व गुरू का लंगर होणार आहे.

सोमवारी बाबा श्रीचंद महाराज गुरुपुरब साजरा होणार आहे. सकाळी १० ते दुपारी १२ गुरबाणी कीर्तन हजुरी रागी जथा भाई दयासिंहजी, दुपारी १२ वाजता लोकार्पण सोहळा व विशेष सत्कार समारंभ यानंतर शब्द, आनंद साहेब, अरदास, हुकमनामा व गुरू का लंगर होणार असून दुपारी १ वाजता कार्यक्रमाची सांगता होईल.

या पवित्र गुरुपुरब सोहळ्यास अहिल्यानगर शहरातील तसेच परिसरातील सर्व भाविक, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि सेवाभावी बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी वीराजी वाही, राजेंद्र कंट्रोड, जनक आहुजा, सतीश गंभीर, अमित थापर, किशोर कंट्रोड, जगजीतसिंह गंभीर, बलराम सचदेव, अवतार गुरली, चरणजीतसिंह गंभीर, हरजीतसिंग वाधवा, निप्पू धुप्पर, राजू जग्गी, पूनम खुल्लर, रेखा गुलाटी, लखू माटलाई आदी प्रयत्नशील आहेत.

# अहिल्यानगर केटरिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी राजेंद्र उदागे यांची फेरनिवड

**उपाध्यक्षपदी मूलचंद महाराज गुजर व कैलास खरपुडे; नव्या कार्यकारिणीची एकमताने निवड**



अहिल्यानगर केटरिंग असोसिएशनच्या सर्वसाधारण बैठकीत संघटनेच्या अध्यक्षपदी राजेंद्र उदागे यांची फेरनिवड करण्यात आली. असोसिएशनच्या सभासदांनी एकमताने उदागे यांच्याकडे पुन्हा अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्याचा आग्रह धरला.

नगर – अहिल्यानगर केटरिंग असोसिएशनच्या सर्वसाधारण बैठकीत संघटनेच्या अध्यक्षपदी राजेंद्र उदागे यांची फेरनिवड करण्यात आली. असोसिएशनच्या सभासदांनी एकमताने उदागे यांच्याकडे पुन्हा अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्याचा आग्रह धरला. बैठकीत नवीन कार्यकारिणीचीही निवड करण्यात आली. नगर कल्याण रोड वरील जाधव लोन येथे पार पडलेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी विश्वजीत बोरा होते. यावेळी मागील वर्षभरात असोसिएशनच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच केटरिंग व्यवसायाशी संबंधित विविध प्रश्न, अडचणी आणि प्रशासकीय पातळीवरील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी मूलचंद महाराज गुजर आणि कैलास खरपुडे, खजिनदारपदी किशोर उपाध्ये, सचिवपदी सोमनाथ रोकडे, तर सहसचिवपदी जालिंदर वाळके यांची एकमताने निवड करण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य म्हणून गोटू खंडेलवाल, अजय नरवडे, अमित पटवा, रवी उपाध्ये, अशोक काटकर, सचिन रणसुंबे, विश्वजीत बोरा, पवन खंडलवाल, निशांत भोगे, ॲड. गौतम गुगळे, कृष्णा शर्मा आणि सुदर्शन कुंटे यांची निवड करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांवर चर्चा : सध्या अन्न व औषध प्रशासनाकडून केटरिंग व्यवसायासाठी लागू करण्यात आलेल्या विविध नियम व अटी, तसेच त्यांची अंमलबजावणी याबाबत बैठकीत चर्चा झाली. व्यवसाय करताना येणाऱ्या प्रशासकीय अडचणी, परवाने, नोंदणी आणि इतर संबंधित प्रश्न संघटितपणे प्रशासनासमोर मांडून त्यावर मार्ग काढण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

असोसिएशनच्या सभासदांच्या प्रश्नांसाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, संघटनेच्या माध्यमातून सभासदांना आवश्यक ते पाठबळ द्यावे आणि त्यांच्या वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्वरूपाच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या आवाहनाला उपस्थित सभासदांनी सकारात्मक प्रतिसाद देत संघटनेच्या कामकाजासाठी सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली.

अध्यक्ष राजेंद्र उदागे यांनी सभासदांचे आभार मानले. अहिल्यानगर केटरिंग असोसिएशनच्या उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याबरोबरच केटरिंग व्यावसायिकांचे प्रश्न राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर फेडरेशन ऑफ ऑल इंडिया केटरिंग संघटने कडे मांडण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय व राज्य पातळीवरील केटरिंग संघटनांच्या उपक्रमांमध्ये अहिल्यानगर असोसिएशनचा सक्रिय सहभाग राहील. त्यासाठी सर्व पदाधिकारी आणि सभासदांनी एकत्रितपणे काम करून संघटनेला बळ द्यावे, असे आवाहन उदागे यांनी केले.

संघटनेच्या माध्यमातून केटरिंग व्यावसायिकांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. व्यवसायाशी संबंधित बदलते नियम, प्रशासनाशी समन्वय आणि सभासदांच्या अडचणी यावर भविष्यातही नियमितपणे चर्चा करून त्यावर मार्ग काढण्याचे ठरविण्यात आले.

प्रास्ताविक जालिंदर वाळके यांनी केले. गोटू खंडेलवाल यांनी आभार मानले. बैठकीस असोसिएशनचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि सभासद उपस्थित होते.


# काही इमारती आरामदायी का वाटतात, तर काही का नाहीत?

काही इमारतींमध्ये प्रवेश करताच मन प्रसन्न होते, तर काही ठिकाणी नकळत अस्वस्थ वाटते. कुठे जागा मोठी असूनही कोंदट वाटते, तर कुठे लहान जागाही मोकळी आणि आरामदायी भासते. हा केवळ आवडीनिवडीचा विषय नाही. इमारतीचे प्रमाण, मांडणी, प्रकाश, हवा, साहित्य, मानवी हालचाल आणि परिसराशी असलेले नाते यांचा एकत्रित परिणाम माणसाच्या मनावर होत असतो.

Architect एखादी इमारत पाहताना केवळ तिचे elevation किंवा बाह्य सौंदर्य पाहत नाही. सर्वप्रथम तो माणूस आणि इमारत यांचे नाते समजून घेतो. दरवाजा किती मोठा आहे? जिना चढताना शरीराला किती सहजता आहे? कॉरिडॉरमध्ये दोन व्यक्ती सहजपणे एकमेकांना ओलांडू शकतात का? खोलीचे आकारमान आणि छताची उंची यांचे प्रमाण योग्य आहे का? या सगळ्याचा संबंध Anthropometry, म्हणजे मानवी शरीराच्या मापमानाशी असतो.


इमारतीमध्ये Proportion म्हणजे विविध घटकांमधील योग्य प्रमाण अत्यंत महत्त्वाचे असते. खिडकीच्या आकारापासून भिंतीच्या लांबीपर्यंत, फर्निचरपासून मोकळ्या जागेपर्यंत प्रत्येक घटकाचा दुसऱ्या घटकाशी संवाद असतो. प्रमाण बिघडले की जागा मोठी असूनही अस्वस्थ वाटू शकते. योग्य प्रमाणामुळे मात्र मनाला एक प्रकारची स्थिरता मिळते.

त्यानंतर येते Symmetry, symmetry आणि Rhythm. सममितीमुळे स्थैर्य आणि शिस्त जाणवते. विचारपूर्वक केलेली असममिती जागेला गतिमानता आणि उत्सुकता देते. खिडक्या, स्तंभ, openings, प्रकाश-छाया किंवा structural elements यांची पुनरावृत्ती योग्य लयीत असेल तर डोळ्यांना ती सहज समजते. पण अति repetition कंटाळवाणे होऊ शकते आणि कोणतीही लय नसलेली रचना गोंधळ निर्माण करू शकते.






प्रकाश, हवा आणि Texture हे इमारतीच्या अनुभवाचे पुढचे महत्त्वाचे घटक आहेत. नैसर्गिक प्रकाशाचा योग्य प्रवेश, नियंत्रित सूर्यप्रकाश, पुरेशी हवा आणि बाहेरील दृश्याशी असलेला संबंध मनाला आराम देतो. त्याउलट सतत कृत्रिम प्रकाश, चकाकणारे surfaces, अतिशय कठीण किंवा थंड textures, अंधारे कोपरे किंवा बंदिस्तपणा अस्वस्थता निर्माण करू शकतात. लाकूड, दगड, विटा किंवा इतर नैसर्गिक textures योग्य प्रमाणात वापरल्यास जागेला उबदारपणा आणि आपलेपणा मिळतो.





माणसाच्या Psychology चा विचारही तितकाच महत्त्वाचा आहे. एखाद्या इमारतीत प्रवेश केल्यानंतर आता कुठे जायचे? हा प्रश्न पडत असेल, तर इमारत वापरणाऱ्याशी योग्य संवाद साधत नाही. प्रवेशद्वार, Reception, जिना, Lift, सार्वजनिक आणि खासगी भाग, तसेच बाहेर पडण्याचे मार्ग सहज समजले पाहिजेत. माणसाला इमारतीत हरवल्यासारखे वाटू नये. स्पष्ट मार्गदर्शन, योग्य दृश्यसंपर्क आणि जागांची नैसर्गिक क्रमवारी मनाला सुरक्षिततेची भावना देते.

यामध्ये Spatial Hierarchy देखील महत्त्वाची असते. प्रत्येक जागा सारखी महत्त्वाची दाखवली तर इमारतीची दिशा आणि उद्देश समजणे कठीण होते. प्रवेश, मुख्य जागा, दुय्यम जागा आणि सेवा क्षेत्र यांच्यात आकार, उंची, प्रकाश किंवा दृश्यसंपर्कातून योग्य फरक जाणवला पाहिजे. माणसाच्या मनाला काय महत्त्वाचे आहे? हे जागा स्वतःच सांगत असेल, तर इमारत वापरणे अधिक सहज होते.

इमारतीचा आराम हा केवळ दिसण्यापुरता नसतो; ध्वनी, वास, तापमान आणि स्पर्श यांचाही त्यावर परिणाम होतो. सततचा आवाज, प्रतिध्वनी, अतिउष्ण पृष्ठभाग, अपुरा airflow किंवा अस्वस्थ करणारे materials एखादी सुंदर जागाही अप्रिय बनवू शकतात. Architecture ही डोळ्यांबरोबरच कान, त्वचा आणि शरीराने अनुभवायची कला आहे.

इमारत केवळ आतून आरामदायी असणे पुरेसे नाही. ती परिसराशीही संवाद साधणारी असावी. सूर्याची दिशा, वाऱ्याची दिशा, रस्ता, झाडे, शेजारच्या इमारती, आवाज, views आणि आजूबाजूचा scale यांचा विचार करून building ची orientation, openings, shading, entrance आणि landscape ठरवले तर इमारत परिसरावर लादलेली वस्तू न वाटता त्या जागेचा भाग वाटते.

उदाहरणार्थ, अत्यंत उंच आणि बंद भिंतींची इमारत अरुंद रस्त्यावर उभी केली तर पादचाऱ्याला दडपण जाणवू शकते. त्याच ठिकाणी योग्य setback, झाडे, मानवी प्रमाणातील entrance आणि पारदर्शक किंवा अर्धपारदर्शक भाग वापरल्यास इमारत आणि रस्ता यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होतो. Context ला प्रतिसाद देणे म्हणजे इमारतीची नक्कल करणे नव्हे; तर त्या जागेच्या गुणधर्मांना Architecture च्या भाषेत उत्तर देणे होय.

म्हणूनच चांगली Architecture म्हणजे केवळ सुंदर facade किंवा महागडे finishing नव्हे. ती शरीराला सहजता, डोळ्यांना समतोल, मनाला सुरक्षितता आणि वापराला स्पष्टता देते.

एखाद्या इमारतीची खरी परीक्षा तिच्याकडे पाहताना होत नाही; ती वापरताना माणसाला कशी वाटते, यावर होते.

**- आर्किटेक्ट स्वरूपा कुलकर्णी**
Ingenious Design Studio
**संपर्क:** ९१६८२२२६२२
**इ-मेल:** ingeniousdstudio@gmail.com
1. Member of AESA, Ahilyanagar region
2. Empanelled Architect, Nasik region
3. Architectural Consultant for Guinness World Records



AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# एलआयसी एजंट्स पतसंस्थेतील गैरकारभाराची चौकशी करा

## प्रमोद छाजेड यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन



नगर - पुणे येथील एलआयसी एजंट्स नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिवाजीनगर या संस्थेतील कथित गैरप्रकार, सहकार कायद्याचे उल्लंघन आणि संचालक मंडळाच्या कामकाजा बाबत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी अहिल्यानगर येथील रहिवासी प्रमोदकुमार ताराचंद छाजेड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे.

छाजेड यांनी मुख्यमंत्री कार्यालयाला पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संस्थेतील विविध बाबींबाबत त्यांनी यापूर्वीही अनेक वेळा ई-मेलद्वारे शासनाचे लक्ष वेधले आहे. संस्थेतील कथित गैरप्रकारांची कागदपत्रे व पुरावे आपणाकडे वेळोवेळी सादर केल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

निवेदनानुसार, ७ मार्च २०२५ रोजी संस्थेच्या अध्यक्ष सौ. वैशाली दत्तात्रय रोहकले यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीबाबत गंभीर आक्षेप घेण्यात आले. प्रवीण गजानन भालेराव यांना संचालक मंडळाची सभा बोलावण्याचा अधिकार नसतानाही त्यांनी सभा बोलावली. तसेच सौ. वैशाली रोहकले यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिलेला नसताना त्यांचा राजीनामा मंजूर करण्यात आल्याचा आणि त्यानंतर अध्यक्षपदाच्या निवडीसंदर्भात सहकार विभागाला पत्र देण्यात आल्याचा आरोप आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोष आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच

अध्यक्षपदाचा राजीनामा दिलेला नसताना तो मंजूर केल्याचा आरोप गंभीर आहे. त्यानंतर सौ.वैशाली रोहकले यांना संचालक मंडळाच्या बैठकींसाठी निमंत्रित करण्यात आले का, याचीही चौकशी होणे आवश्यक आहे, असे छाजेड यांनी निवेदनात म्हटले आहे.

संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालातील काही बाबींवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. संचालक मंडळातील संचालकांच्या ठेवींसह आवश्यक माहिती लेखापरीक्षण अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे का, तसेच संबंधित संचालकांना बैठकीची माहिती व निमंत्रण देण्यात आले होते का, याची तपासणी करावी.


गेल्या वर्षभरात संस्थेतील काही संचालकांना त्रास देऊन राजीनामा देण्यास भाग पाडण्यात आल्याचा तसेच रिक्त झालेल्या संचालक पदांबाबत नियमबाह्य पद्धतीने कार्यवाही झाल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. मात्र, या सर्व आरोपांची अधिकृत चौकशी होऊन वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

संस्थेतील कारभारामुळे संस्था अडचणीत आली असून कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशीसाठी मला बोलावल्यास माझ्याकडे संबंधित बाबींचे पुरावे सादर करण्यास तयार आहे, तसेच प्रवीण भालेराव यांनी सहकार कायदा पायदळी तुडवून काम करीत असताना संचालक पदाचा दुरुपयोग करून संस्थेला, सभासद, सहकार खाते यांना फसवून आपल्या ७ वर्षे जुने असलेल्या व पहिला बोजा असताना पुन्हा चार चाकी गाडी संस्थेला अगोदर तारण न देता त्या गाडीवर बेकायदा कर्ज घेतले आहे. या प्रकरणाचा सर्वत्र बोभाटा झाल्यावर ९ ते १० महिन्यांनी पहिला बोजा उतरवून संस्थेचा बोजा लावला. या प्रकारे आपल्या पदाचा दुरुपयोग केला. सर्व बाबतीत खोटे बोलून लबाडी करणे हेच भालेराव यांचे उद्योग असल्याचे छाजेड यांनी म्हटले आहे.

दरम्यान,सौ. वैशाली रोहकले यांनीही संबंधित प्रकरणाबाबत तक्रार केली. त्या तक्रारीची प्रत मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठविल्याचे त्यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रकरणाची सहकार विभागामार्फत निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी आणि संबंधित सभासदांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी प्रमोद छाजेड यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

## वंदू गणेशा...



रेखाचित्रकार दिलीप शहापूरकर,
माणिकचौक, अ.नगर
मो.७९७२९८९७८०

# अहिल्यानगरचे राजेंद्र खिलारी यांना राज्यस्तरीय गुणगौरव पुरस्कार प्रदान



नगर - शिर्डी येथील बी दि चेंज फाउंडेशनच्यावतीने अहिल्यानगरचे पुत्र व मुंबई उच्च न्यायालयातील सेक्शन ऑफिसर राजेंद्र खिलारी यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार माजी सुभेदार मेजर सुनील मोहोड यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. शिर्डी येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात सन्मानचिन्ह, साईबाबांच्या पादुका, शाल, श्रीफळ देऊन खिलारी यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अभिनेत्री निवेदिता पगार, मेकअप आर्टिस्ट शुभांगी थोरात, पंजाब नॅशनल चे मॅनेजर निलेश घोडेचोर, नाशिक त्रिदल सैनिक संघाचे कार्याध्यक्ष अरुण भंडारे, डॉ. निलेश गायकवाड, अ‍ॅड.योगेश दवंगे, फाउंडेशनचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे आदी उपस्थित होते.

राजेंद्र खिलारी हे अहिल्यानगर येथील लक्ष्मीनगरचे रहिवासी असून मुंबई उच्च न्यायालयात कक्ष अधिकारी म्हणून कामकाज पाहतात. त्यांना यावर्षी दिल्ली येथे शासकीय विधी प्रशासनातील वरिष्ठ जीवनगौरव राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. याआधी २०१९ मध्ये त्यांचे नाव इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये त्यांनी विविध शाखेत मिळवलेल्या ९ पदव्यांमुळे सर्वात उच्च शिक्षित न्यायालयीन अधिकारी म्हणून गुणगौरव झाला आहे. श्री. खिलारी यांची समाजसेवा, प्रामाणिक कार्यपद्धतीबरोबरच कर्तव्यनिष्ठा याला ते महत्त्व देतात.

श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे अहिल्यानगर जिल्हा समन्वयक नगर व जामखेड तालुक्याचे अध्यक्ष एकनाथ खिलारी यांचे ते चिरंजीव आहेत.

# मुंबई येथील शासकीय मेडिकल कॉलेज अ‍ॅण्ड के. ई. एम हॉस्पिटल येथे अहिल्यानगरच्या हर्ष लवांडे याची एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड



नगर- नगर येथील हर्ष सचिन लवांडे याने राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा (नीट) परीक्षात ६२० गुण मिळवून उल्लेखनीय यश मिळवले असून मुंबई येथील शासकीय मेडिकल कॉलेज अ‍ॅण्ड के एम हॉस्पिटल येथे एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.

वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न उराशी बाळगून हर्षने सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि योग्य नियोजनाच्या जोरावर हे यश मिळवले. हर्ष हामूळ गाव मांडवे ता. पाथर्डी येथील असून, नगर येथे वडील डॉ. सचिन लवांडे आणि आई डॉ. वंदना लवांडे-अडसुरे हे दोघेही वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. तसेच स्पेस डेव्हलपर्सचे संचालक राहूल अडसुरे यांचा तो भाचा आहे. आई-वडिलयांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि कुटुंबीयांची साथ यामुळे हर्षला आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा मिळाली.



जिल्हास्तरीय शालेय हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झालेल्या टाकळी खातगाव, सारोळा कासार, देहरे, खारेकर्जुने संघातील खेळाडू, मार्गदर्शक शिक्षक व तालुका क्रीडा समितीचे पदाधिकारी.

# सारोळा कासार, टाकळी खातगाव, देहरे, खारेकर्जुने संघांची जिल्हास्तरीय शालेय हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड

नगर - जिल्हा क्रीडा कार्यालय व नगर तालुका क्रीडा समिति यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय हॉलीबॉल स्पर्धा नगरमधील वाडिया पार्क येथील मैदानावर उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या हॉलीबॉल सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत सारोळा कासार, टाकळी खातगाव, देहरे, खारेकर्जुने संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेत १४ वर्षे मुलांच्या गटात नवभारत विद्यालय, देहरे संघाने प्रथम क्रमांक पटकावला. न्यू इंग्लिश स्कूल, हिंगणगाव संघाने द्वितीय, तर खारे कर्जुने विद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला.

१७ वर्षे मुलांच्या गटात खारेकर्जुने विद्यालय प्रथम, न्यू इंग्लिश स्कूल, हिंगणगाव द्वितीय, तर सारोळा कासार विद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला.

१९ वर्षे मुलांच्या गटात हनुमान विद्यालय, टाकळी खातगावने प्रथम, वाळकी विद्यालयाने द्वितीय, तर सारोळा कासार विद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला.

१४ वर्षे मुलींच्या गटात सारोळा कासार विद्यालयाने प्रथम, नवभारत विद्यालयाने द्वितीय, तर कौडगाव विद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला. १७ वर्षे मुलींच्या गटात माउंट सिनाय, सारोळा बद्री संघाने प्रथम, कौडगाव विद्यालयाने द्वितीय, तर नवभारत विद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला.

१९ वर्षे मुलींच्या गटात हनुमान विद्यालय, टाकळी खातगाव संघाने प्रथम, कौडगाव विद्यालयाने द्वितीय, तर सारोळा कासार विद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला.

या स्पर्धेतील विजयी संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्यातील गुणवत्ता पुढे यावी, यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन महत्त्वाचे ठरत असल्याचे क्रिडा समिती अध्यक्ष महेंद्र हिंगे यांनी सांगितले.

स्पर्धेप्रसंगी नगर तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष महेंद्र हिंगे, वैभव शिंदे, मिलिंद थोरे, सौरभ सानप, बबन शिंदे, शिरीष टेकाळे, अनिल शिंदे, चंद्रकांत सरोदे, भगवान मते, महेश वाघ, प्रियंका आदी उपस्थित होते.

# संशोधन व नाविन्यता हा विकसित भारताचा पाया

## ब्रिगेडियर राजीव चावला यांचे प्रतिपादन; दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्सतर्फे अभियंता दिन उत्साहात साजरा; राजेश जग्गी यांना जीवनगौरव पुरस्कार



राजेश जग्गी यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना भारतभूषण भगवत, ब्रिगेडियर राजीव चावला, द्विज काबरा, मनोहर अणेकर आदि. (छाया - लहू दळवी)

नगर - सरकारच्या औद्योगिक धोरणामुळे देश सेमीकंडक्टर, संरक्षण साहित्य, इलेक्ट्रिक वाहने, हवाई क्षेत्र आदी विविध क्षेत्रांत वेगाने प्रगती करीत आहे. संरक्षण क्षेत्राचे बजेट उत्तरोत्तर वाढत असून राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने देश स्वावलंबी होत आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी अभियंत्यांनी नवीन संकल्पनांवर संशोधन करावे. संशोधन, नाविन्यता आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून देशाच्या प्रगतीला गती मिळू शकते, असे आवाहन ब्रिगेडियर राजीव चावला यांनी केले.

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या १६६ व्या जयंतीनिमित्त दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्राच्या वतीने दि अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने टिकाऊ आणि तंत्रज्ञानिक स्वावलंबी भारतासाठी अभियांत्रिकी उत्कृष्टता या मध्यवर्ती संकल्पनेवर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास भाग्यलक्ष्मी मिल (पोलाद स्टील), जालना येथील रिसर्च अँड डेव्हलपमेंट हेड व संचालक द्विज काबरा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. गुणवत्ता आश्वासन नियंत्रक (वाहने) (सीक्यूएव्ही), अहिल्यानगरचे नियंत्रक ब्रिगेडियर राजीव चावला यांनी मध्यवर्ती संकल्पनेवर प्रमुख व्याख्यान दिले.

साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे अध्यक्ष व अडसूळ टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. अनिरुद्ध अडसूळ सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेचे माजी अध्यक्ष मनोहर अणेकर, मानद सचिव डॉ. दीपक विधाते तसेच आयईआय अहिल्यानगर स्थानिक केंद्राचे अध्यक्ष भारतभूषण भागवत व्यासपीठावर उपस्थित होते. अध्यक्षस्थान भारतभूषण भागवत यांनी भूषविले.

द्विज काबरा यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा औद्योगिकीकरणाशी प्रत्यक्ष संबंध असल्याचे स्पष्ट केले. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे औद्योगिक विकासास मोठी मदत होत असून पोलाद स्टील नेहमीच उत्कृष्टतेवर भर देत राष्ट्रउभारणीच्या कार्यात योगदान देत असल्याचे त्यांनी सांगितले.

औद्योगिक उत्पादनांचा समाजाच्या आणि देशाच्या विकासासाठी उपयोग व्हावा. त्याचबरोबर औद्योगिक प्रदूषण कमीत कमी कसे होईल, याकडे अभियंत्यांनी विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन द्विज काबरा यांनी केले.

डॉ. अनिरुद्ध अडसूळ यांनी देशाच्या प्रगतीमध्ये अभियंत्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे नमूद केले. अडसूळ टेक्निकल कॅम्पसमधून उत्कृष्ट अभियंते घडत असल्याबद्दल त्यांनी अभिमान व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात भारतभूषण भागवत यांनी सखोल तंत्रज्ञानामुळे उत्पादन क्षेत्राचा विकास कशा पद्धतीने होत आहे, हे स्पष्ट केले. हवामान बदलाची निकड आणि स्वच्छ, अधिक स्मार्ट पायाभूत सुविधांची वाढती मागणी यामुळे अभियांत्रिकी क्षेत्रातील प्राधान्यक्रमांची नव्याने व्याख्या झाली आहे.

शाश्वतता हा आता केवळ एक पर्याय राहिलेला नसून तो अभियांत्रिकी क्षेत्राचा आदेश बनला आहे. ऊर्जा कार्यक्षमता, पर्यावरण संवर्धन याबरोबरच ग्रीन हायड्रोजन, प्रगत जैवइंधन, एआय-चालित सोल्यूशन्स आणि कार्बन-सजग डिझाइन यांसारख्या अग्रगण्य तंत्रज्ञानाला पुढे नेण्याचे काम अभियंते करीत आहेत.

अभियंत्यांचे तांत्रिक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्सचे अहिल्यानगर केंद्र विविध विषयांवर व्याख्याने व चर्चासत्रांचे आयोजन करीत असते, असे भारतभूषण भागवत यांनी सांगितले.

अभियंता दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने विविध अभियंता पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. फोरकास इम्पेक्स या शतप्रतिशत निर्यातप्रधान उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक राजेश जग्गी यांना अभियांत्रिकी, औद्योगिक व सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

याशिवाय जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २० हून अधिक नामवंत अभियंत्यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार, अभियांत्रिकी उपलब्धी पुरस्कार, महिला अभियंता पुरस्कार, उदयोन्मुख अभियंता पुरस्कार तसेच चत्रभुज बजाज उद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील २०२६ बॅचमधील अभियांत्रिकी शाखेतील उच्च गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनाही संस्थेच्या सभासदांनी प्रायोजित केलेली रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

डॉ. विठ्ठलराव विखे अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियंता दिनाच्या मध्यवर्ती संकल्पनेवर पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी उपस्थितांना अभियंता शपथ देण्यात आली. मानद सचिव डॉ. दीपक विधाते यांनी प्रास्ताविक केले. सहमानद सचिव प्रदीप तांदळे यांनी आभारप्रदर्शन केले. माजी मानद सचिव अभियंता अभय राजे व सहमानद सचिव डॉ. दादासाहेब करंजुले यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकारिणी सदस्य अरविंद पारगावकर, अविनाश कुलकर्णी, प्रकाश गांधी, हरिश्चंद्र थिगळे, रामनाथ वायकर, मधुकर बालटे, जी. सी. मोटगी तसेच कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

कार्यक्रमास औद्योगिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रांतील २०० हून अधिक अभियंते उपस्थित होते.




# उशिरा जेवण केल्याने मोठे नुकसान

कामाचा ताण, प्रवासातील मोठा वेळ आणि सतत बदलणाऱ्या वेळापत्रकामुळे अनेकांना रात्रीचे जेवण उशिरा करावे लागते. दिवसभराच्या व्यस्त दिनचर्येमुळे जेवणाची वेळ पुढे ढकलली जाणे ही आज अनेकांच्या जीवनशैलीतील सामान्य बाब झाली आहे. कधीतरी रात्री उशिरा जेवण झाल्यास त्याचा शरीरावर सहसा फार मोठा परिणाम जाणवत नाही; पण ही सवय रोजची झाल्यास आरोग्याचे मोठे नुकसान होऊ शकते.

जेवणाची वेळ शरीराच्या नैसर्गिक जैविक घड्याळाशी संबंधित असते. रात्री उशिरा जेवण केल्यास शरीराची अन्नावर प्रक्रिया करण्याची पद्धत बदलू शकते. विशेषतः रात्रीच्या वेळी शरीराची चयापचय प्रक्रिया दिवसभराच्या तुलनेत मंदावलेली असते. त्यामुळे उशिरा घेतलेल्या जेवणानंतर रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी शरीराला अधिक मेहनत घ्यावी लागू शकते. ही सवय सातत्याने कायम राहिल्यास रक्तातील साखरेच्या नियंत्रणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. रात्री उशिरा जेवून लगेच झोपण्याची सवय असल्यास पचनक्रियेलाही त्रास होऊ शकतो. जेवणानंतर शरीराला अन्न पचवण्यासाठी काही वेळ आवश्यक असतो; मात्र झोपण्याची वेळ जवळ आल्याने ही प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच व्यक्ती आडवी होते. परिणामी काही लोकांना ॲसिडिटी, छातीत जळजळ, पोट फुगणे किंवा अस्वस्थपणा जाणवू शकतो. विशेषतः जड, तेलकट किंवा मसालेदार पदार्थ रात्री उशिरा खाल्ल्यास हा त्रास अधिक जाणवण्याची शक्यता असते.




**काळजी घ्या**

जेवणाची वेळ महत्त्वाची असते. कारण रात्री झोपण्याच्या अगदी जवळ जेवण केल्यास झोपण्यापूर्वी पोटातील अन्न रिकामे होण्यासाठी मिळणारा वेळ कमी होतो. दररोज रात्री उशिरा जेवणे ही सवय विशेषतः व्यस्त कामाच्या वेळापत्रकामुळे सामान्य वाटू शकते; मात्र जेवणाची वेळ केवळ पचनक्रियेवरच नव्हे, तर शरीरातील इतर प्रक्रियांवरही परिणाम करू शकते. दिवसाच्या सुरुवातीच्या तासांच्या तुलनेत संध्याकाळनंतर किंवा रात्रीच्या वेळी शरीराची इन्सुलिन संवेदनशीलता सामान्यतः कमी होत जाते. इन्सुलिन हे रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी महत्त्वाचे हार्मोन आहे. शरीराची इन्सुलिनला प्रतिसाद देण्याची क्षमता कमी झाल्यास जेवणानंतर रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करणे अधिक कठीण होऊ शकते.

# हृदयविकाराचे निदान ६० सेकंदांमध्ये

हृदयविकाराच्या रुग्णांसाठी वेगवान निदान आणि आधुनिक उपचारांच्या दिशेने 'आयआयटी' कानपूरने दोन महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान विकसित केले आहे. यामध्ये अवघ्या ६० ते ९० सेकंदांत अहवाल देणारा बायोसेंसर आणि हळद-मधाच्या कोटिंगचा बायोडिग्रेडेबल स्टेंट यांचा समावेश आहे. या संशोधनामुळे भविष्यात हृदयविकाराचे निदान आणि उपचार अधिक वेगाने करण्यास मदत होण्याची शक्यता आहे. 'आयआयटी' कानपूरच्या 'बायो सायन्स अँड बायो इंजिनीअरिंग' विभागातील प्रोफेसर संतोष कुमार मिश्रा आणि पीएच. डी. संशोधक तमोजीत सांतरा यांनी या तंत्रज्ञानावर काम केले आहे.

हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण होणे किंवा 'एथेरोस्क्लेरोसिस'सारख्या स्थितीची तपासणी करण्यासाठी सध्या विविध चाचण्या केल्या जातात. काही प्रक्रियांमध्ये नमुने तपासल्यानंतर अहवाल मिळण्यासाठी अनेक तास लागू शकतात. आयआयटी कानपूरच्या संशोधकांनी विकसित केलेला बायोसेंसर विशिष्ट बायोमार्कर्सची जलद तपासणी करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. या उपकरणाच्या माध्यमातून अवघ्या ६० ते ९० सेकंदांमध्ये संबंधित चाचणीचा निकाल मिळवण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे रुग्णाची स्थिती तातडीने समजून घेऊन डॉक्टरांना उपचाराबाबत निर्णय घेण्यास मदत होऊ शकते. दुसरे संशोधन हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये बसवण्यात येणाऱ्या स्टेंटशी संबंधित आहे. संशोधकांनी हळद आणि मधाचे कोटिंग असलेला बायोडिग्रेडेबल स्टेंट विकसित केला आहे.


**आरोग्यमंत्र**



सामान्यतः रक्तवाहिन्या खुल्या ठेवण्यासाठी धातू किंवा इतर कृत्रिम पदार्थांपासून तयार केलेले स्टेंट वापरले जातात; मात्र 'बायोडिग्रेडेबल स्टेंट' विशिष्ट कालावधीनंतर शरीरात हळूहळू विघटित होण्याच्या संकल्पनेवर आधारित आहे. त्यामुळे भविष्यात दीर्घकाळ शरीरात कायमस्वरूपी स्टेंट राहण्याची गरज कमी करण्याच्या दृष्टीने हे तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरू शकते. हळद आणि मधातील नैसर्गिक घटकांचा वापर स्टेंटच्या कोटिंगसाठी करण्यात आला आहे; मात्र या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष मानवी उपचारांमध्ये वापर करण्यापूर्वी त्याची सुरक्षितता आणि परिणामकारकता सिद्ध करणाऱ्या आवश्यक चाचण्या पूर्ण होणे गरजेचे आहे.

# पर्याय मधल्या वेळच्या खाण्याचे...

वजन कमी करणं सोपं नसतं. यासाठी कमी कॅलरी खाऊन अधिक कॅलरी खर्च करणं गरजेचं असतं. म्हणूनच आपल्या आहारात कमी कॅलरीयुक्त पदार्थांचा समावेश असायला हवा. त्यातही दोन जेवणांच्या मध्ये चहाच्या वेळी आरोग्यदायी असं काही तरी खायला हवं. मधल्या वेळच्या खाण्याचे हे काही पर्याय...



**काय खावं?**

* सुका मेवा हा मधल्या वेळच्या खाण्याचा खूप चांगला पर्याय आहे. शेंगदाणे, चणे, बदाम, काजू, आक्रोड, बेदाणे, पिस्ते असे असंख्य पर्याय या वेळच्या खाण्यामध्ये आहेत. सध्या विविध प्रकारच्या बियाही मिळतात. या बियाही तुम्ही खाऊ शकता. सुक्या मेव्यामुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं राहील.

* चहाऐवजी उकडलेली अंडी खावीत. अंड्यांमधून तुम्हाला प्रथिनं मिळू शकतात. न्याहरीलाही उकडलेली अंडी खाता येतील.

* मधल्या वेळी प्रथिनयुक्त पदार्थ खाता येतील. वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत प्रथिनांना प्रचंड महत्त्व आहे. प्रथिनांमुळे स्नायू बळकट होतात. म्हणूनच अशा पदार्थांचा समावेश आहारात करता येईल.

* तुम्ही पनीरचे पदार्थही खाऊ शकता. बाजारात मिळणाऱ्या लो फॅट पनीरचा वापर करता येईल. पनीर मर्यादित प्रमाणात खाल्ल्याने बरेच लाभ मिळतील. पनीर हा दुग्धजन्य पदार्थ असल्यामुळे भरपूर प्रथिनं मिळतील.

# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी...

स्मरणशक्ती सुधारण्यासोबतच एकाग्रता वाढवायची असेल तर तुम्ही काही आयुर्वेदिक उपाय करू शकता.

* मेडिटेशन म्हणजे ध्यानधारणा. मानसिक आरोग्य उत्तम राखायचं असेल तर मेडिटेशन करायला हवं. मेडिटेशनमुळे शारीरिक आरोग्यही चांगलं राहतं. दिवसभरात फक्त दहा मिनिटं मेडिटेशन केल्यामुळे बुद्धी तल्लख होते तसंच मेंदू अधिक सक्षम होतो. मेडिटेशन करताना आपण श्वसनावर लक्ष केंद्रित करतो. यामुळे एकाग्रता वाढायला मदत होते. परीक्षेच्या काळात मुलांवर खूप ताण येतो. मेडिटेशनमुळे ताण कमी होऊ शकतो.

* मेंदूला चालना देण्यासाठी अगदी सोपा उपाय करता येईल. विविध क्रिया करताना नेहमीच्या हाताऐवजी दुसऱ्या हाताचा वापर करा. उजव्या लोकांना खाण्यासाठी कवा दात घासण्यासाठी डाव्या हाताचा वापर करता येईल तर डावखुरे लोक उजव्या हाताने काही कामं करू शकतील.



**आयुर्वेद आणि विकार**


* शरीरातल्या विविध अवयवांना, त्यातही मेंदूला उत्तम रक्तपुरवठा झाला की त्याचं कार्य सुधारतं. मेंदूला अधिक रक्तपुरवठा करण्यासाठी काही व्यायामपकार करता येतील. काही योगासनांमुळेही मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात वाढ होऊ शकते.

* शरीरासोबतच मानसिक आरोग्यावरही आपल्या आहाराचा परिणाम होत असतो. मेंदूलाही खाद्य हवं असतं.

# बाळाच्या जन्मानंतर महिलांमध्ये थायरॉईड्स

बाळाच्या जन्मानंतर आईच्या आयुष्यात अनेक बदल होतात. धावपळ, झोपेची कमतरता, हार्मोन्समधील बदल आणि बाळाची सततची काळजी यामुळे थकवा, मूडमध्ये बदल किंवा वजनात चढ-उतार होणं सामान्य मानलं जातं; मात्र हीच लक्षणं काही वेळा थायरॉईडायटिसचीही असू शकतात. डिलिव्हरीनंतर पहिल्या वर्षात काही महिलांना ही समस्या जाणवू शकते. विशेष म्हणजे, याची लक्षणं प्रसूतीनंतरच्या रोजच्या त्रासांसारखीच वाटत असल्याने अनेकदा त्याकडे दुर्लक्ष होतं.

'पोस्टपार्टम थायरॉईडायटिस'मध्ये सुरुवातीला थायरॉईड ग्रंथी जास्त सक्रिय होऊ शकते. याला 'हायपरथायरॉईडिझम' म्हणतात. अशावेळी हृदयाची धडधड वाढणे, अस्वस्थ वाटणे, चिडचिड होणे किंवा कोणतंही विशेष कारण नसताना वजन कमी होणे, अशी लक्षणं दिसू शकतात. काही महिलांमध्ये यानंतर थायरॉईडची कार्यक्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे सतत थकवा जाणवणे, उदास वाटणे, बद्धकोष्ठता, त्वचा कोरडी होणे, जास्त थंडी वाजणे आणि कामात लक्ष न लागणे, अशा तक्रारी जाणवू शकतात. काही महिलांमध्ये ही समस्या कालांतराने स्वतःहून कमी होऊ शकते; मात्र काही प्रकरणांमध्ये दीर्घकाळ उपचारांची गरज भासू शकते. त्यामुळे लक्षणं सतत जाणवत असतील, तर डॉक्टरांच्या सल्ल्याने तपासणी करणं महत्त्वाचं आहे.



**जाणून घ्या**

स्तनपान करणाऱ्या महिलांनीही थायरॉईडच्या उपचारांबाबत डॉक्टरांशी मोकळेपणाने बोलावं. डॉक्टरांच्या सल्ल्याने वापरल्या जाणाऱ्या अनेक औषधांचा स्तनपानादरम्यान वापर केला जाऊ शकतो. डिलिव्हरीनंतर थकवा किंवा उदासीनता दीर्घकाळ टिकत असेल, तर त्याकडे फक्त झोप कमी झाल्याचं कारण मानून दुर्लक्ष करू नका. योग्य वेळी तपासणी केल्यास आईची तब्येत सांभाळणं आणि बाळाची काळजी घेणं, दोन्ही सोपं होऊ शकतं.

# काळजी, चिंतेचा रक्तदाबावर परिणाम

आपल्याला अचानक एखादी वाईट बातमी मिळते, महत्त्वाची मीटिंग समोर येते किंवा एखाद्या गोष्टीची भीती वाटते. अशा वेळी हृदयाची धडधड वाढते, श्वासोच्छ्वासाचा वेग वाढतो आणि शरीर सावध होते. हा आपल्या शरीराने 'फाइट-ऑर-फ्लाइट' म्हणजेच संकटाचा सामना करण्यासाठी तयार होण्याच्या दृष्टीने दिलेला नैसर्गिक प्रतिसाद असतो. या वेळी शरीरात ॲड्रेनालिन आणि नॉरॲड्रेनालिन यासारखे स्ट्रेस हार्मोन्स सोडले जातात. त्यामुळे हृदय अधिक वेगाने रक्त पंप करू लागते आणि रक्तवाहिन्यांमध्येही बदल होतात. परिणामी, रक्तदाब काही काळासाठी वाढू शकतो.

चिंता किंवा भीती वाटली की, रक्तदाब वाढणे ही शरीराची तात्पुरती प्रतिक्रिया असू शकते. काही लोकांमध्ये अशा वेळी 'व्हॅसोव्हॅगल रिस्पॉन्स' होऊ शकतो. या प्रतिक्रियेमुळे अचानक हृदयाची गती आणि रक्तदाब कमी होतो. तेव्हा ती व्यक्ती खूप अस्वस्थ होते, तिला चक्कर येते, मळमळते आणि अशक्तपणा जाणवतो. म्हणूनच चिंता किंवा भीतीचा शरीरावर होणारा परिणाम प्रत्येक व्यक्तीत सारखा होत नाही, काहींमध्ये रक्तदाब वाढतो, तर काहींमध्ये तो अचानक कमी होऊ शकतो. चिंता ही फक्त विचारामुळे निर्माण होणारी स्थिती नाही. चिंता किंवा भीतीची भावना निर्माण झाली, की त्याचा परिणाम संपूर्ण शरीरावर होतो. प्रत्यक्षात कोणताही शारीरिक धोका नसला, तरी मेंदू त्या वेळी मात्र धोका असल्याचे संकेत देतो आणि मग सहानुभूतीपूर्वक चेतासंस्थेला चालना मिळते.



**जीवनशैली**

शरीरात पुढील बदल होतात.
*हृदयाची धडधड वाढते
*श्वासोच्छ्वासाची गती वाढते
*घाम येतो
*स्नायूंमध्ये ताण निर्माण होतो
*डोळ्यांच्या बाहुल्या मोठ्या होतात
*मेंदू आणि शरीर अधिक सतर्क होते
*पचनक्रियेत बदल होऊ शकतात
*रक्तदाब काही काळासाठी वाढू शकतो

# सवयी चांगल्या असल्या तरी...

निरोगी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी काही चांगल्या सवयी अंगी बाणवणं गरजेचं असतं. मात्र या चांगल्या सवयींचा अतिरेक होता कामा नये. एखादी सवय चांगली आहे म्हणून आपण तिचा अतिरेक करतो. मात्र याचे दुष्परिणाम होऊ शकतात. आपल्याकडून अजाणतेपणी या चुका घडतात. कोणत्या सवयींमुळे आपण अडचणीत येऊ शकतो? जाणून घेऊ.

* शरीराला जीवनसत्त्वं, खनिजं यांची खूप गरज असते. पण त्यांचं प्रमाण मर्यादित असायला हवं. गरजेपेक्षा अधिक जीवनसत्त्वं शरीरात गेल्यास बरेच दुष्परिणाम दिसून येतात. ठराविक प्रमाणापेक्षा चारपट अधिक जीवनसत्त्वांचं सेवन केल्यास कर्करोग होऊ शकतो, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. म्हणूनच जीवनसत्त्वांच्या गोळ्या घेताना अधिक काळजी घ्यायला हवी.

* अनेकजण दिवसातून तीन ते चार वेळा दात घासतात. मात्र ही सवय चुकीची आहे. सातत्याने दात घासत राहिल्यामुळे दातांवरचा इनॅमलचा थर कमी होतो. सततच्या दात घासण्यामुळे १० ते २० टक्के प्रौढांचे दात खराब होतात. दात घासण्यासाठी शक्यतो सौम्य टूथब्रशचा वापर करावा. दिवसभरात फक्त दोन वेळा हलक्या हातांनी दात घासावेत.

* पोटाचं आरोग्य चांगलं राखण्यासाठी तंतूमय पदार्थ म्हणजे फायबर खाण्याचा सल्ला दिला जातो. अनेकजण गरजेइतकं फायबरही खात नाहीत. मात्र फायबरचं प्रमाण अचानक वाढवल्यास गॅसेसची समस्या उद्भवू शकते. तसंच पोट फुगल्यासारखं वाटू शकतं. फायबरचं पमाण टप्प्याटप्प्याने वाढवावं. एकाच वेळी भरपूर फायबर खाऊ नये. पांढऱ्या ब्रेडऐवजी गव्हाचा ब्रेड खावा. बटाटा वेफर्सऐवजी सफरचंदाचं सेवन करावं. अशा छोट्या बदलांनी फायबरचं प्रमाण वाढवावं.



**कुठे चुकतो आपण?**

* खूप झोपणंही चुकीचं आहे. दररोज नऊ तासांपेक्षा अधिक काळ झोपणाऱ्या लोकांना भविष्यात स्मृतीभ्रंशाचा धोका निर्माण होऊ शकतो, असं काही अभ्यासांमधून समोर आलं आहे.

# हाता-पायाला सूज येतेय?

हात किंवा पायाला सूज येणं ही अनेकांना साधी गोष्ट वाटते. दिवसभर उभं राहणं, जास्त वेळ बसणं, उकाडा, थकवा किंवा जुनी दुखापत यामुळे सूज आली असेल, असं समजून अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात; पण सूज कमी होत नसेल, वारंवार येत असेल किंवा हळूहळू वाढत असेल, तर सावध होण्याची गरज आहे. कारण काही प्रकरणांमध्ये हे 'लिम्फेडेमा' या स्थितीचं लक्षण असू शकतं.

महत्त्वाचं म्हणजे लिम्फेडेमामध्ये सुरुवातीला वेदना असतीलच असं नाही. त्यामुळे 'दुखत नाही म्हणजे गंभीर नाही' असा गैरसमज धोकादायक ठरू शकतो. आपल्या शरीरात लसीका प्रणाली नावाचं एक महत्त्वाचं नेटवर्क असतं. लसीका वाहिन्या आणि लसीका ग्रंथींच्या मदतीने शरीरातील अतिरिक्त द्रव बाहेर काढण्याचं आणि तो पुन्हा रक्ताभिसरणात पोहोचवण्याचं काम केलं जातं. हीच प्रणाली शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीलाही मदत करते. या प्रणालीमध्ये अडथळा निर्माण झाला, वाहिन्यांना नुकसान झालं किंवा लसीका प्रणालीचा विकास व्यवस्थित झाला नाही, तर शरीरातील अतिरिक्त लिम्फ फ्लुइड ऊतींमध्ये साचू शकतो. परिणामी हात, पाय किंवा शरीराच्या इतर भागांमध्ये सूज निर्माण होते. या स्थितीला लिम्फेडेमा म्हणतात. साधारणपणे हात किंवा पायांमध्ये याची लक्षणं दिसतात; मात्र काही वेळा चेहरा, मान, पोट किंवा जननेंद्रियांच्या भागातही सूज येऊ शकते.

लिम्फेडेमाच्या सुरुवातीच्या टप्प्यात सूज फार मोठी दिसेलच असं नाही. त्यामुळे त्याची लक्षणं सहज दुर्लक्षित होऊ शकतात. यापैकी काही बदल जाणवत असतील तर त्याकडे लक्ष द्या.




**आरोग्य चर्चा**

*एका हाताचा किंवा पायाचा आकार दुसऱ्यापेक्षा थोडा वाढलेला जाणवणे
*हात किंवा पाय जड वाटणे
*पूर्वी सहज बसणारी अंगठी अचानक घट्ट होणे
*घड्याळ किंवा बांगडी त्वचेवर नेहमीपेक्षा जास्त घट्ट बसणे
*चप्पल किंवा बूट अचानक कसेतरी घट्ट वाटणे
*कपडे शरीराच्या एका भागावर अधिक घट्ट जाणवणे
*त्वचा ताणलेली किंवा जड वाटणे
*सूज वारंवार येणे किंवा हळूहळू वाढत जाणे

**नवसंशोधन**


## सर्वात प्रभावी प्रतिजैविक!

प्रतिजैविकांमुळे बॅक्टेरियांचा नाश होतो. म्हणूनच बॅक्टेरियांमुळे उद्भवणाऱ्या व्याधींच्या निवारणासाठी प्रतिजैविकं दिली जातात. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये प्रतिजैविकांचा प्रभाव कमी होत असल्याचं दिसून आलं. अनेक बॅक्टेरिया प्रतिजैविकांना प्रतिकार करू लागले. याच कारणामुळे अनेक व्याधींवर उपचार करणं कठीण होऊन बसलं आहे. प्रतिजैविकांना प्रतिकार करणारा क्षयरोग अत्यंत घातक आजार आहे. म्हणूनच प्रतिजैविकांची क्षमता वाढवण्याची गरज आहे. याच प्रक्रियेत मैलाचा दगड ठरावा, असा शोध अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांनी लावला आहे. शास्त्रज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून नवं प्रतिजैविक तयार केलं आहे.




**डोळ्यांचं आरोग्य**

## डोळे सुजतात?



बरेचदा झोपून उठल्यानंतर डोळे सुजल्यासारखे वाटतात. डोळ्यांच्या खाली असणाऱ्या त्वचेला जडत्व आलेलं असतं. यावर बरेचदा वरवरचे उपाय केले जातात. कॉस्मेटिक उत्पादनांच्या वापरामुळे ही समस्या कमी होत नाही. त्यांचा प्रभाव तात्पुरता असतो. डोळे सुजल्यामुळे तुम्ही वयापेक्षा मोठे दिसू लागता, वार्धक्य आल्यासारखं वाटतं. डोळे जड झाल्यामुळे उत्पादकतेवर परिणाम होतो. उत्साह कमी होतो. सतत दमल्यासारखं वाटतं. अंतर्गत दोषांमुळे कवा जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे डोळे सुजल्यासारखे दिसतात. या समस्येवर आहाराद्वारे नियंत्रण मिळवता येऊ शकतं. कोरडेपणामुळे डोळे जड होतात. म्हणून भरपूर पाणी प्यावं. रसाळ फळं खावीत.

**जपणूक त्वचेची**

## वय वाढल्याच्या खुणा...



त्वचेचं आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी योग्य सौंदर्यप्रसाधनांची निवड करायला हवी. बाजारात असंख्य फेसवॉश मिळतात. प्रत्येकाचे गुणधर्म वेगवेगळे असतात. तजेला टिकवून ठेवण्यासाठी त्वचेच्या प्रकारानुसार फेस वॉश निवडावा. कोरडी त्वचा असणाऱ्यांनी त्वचेला ओलावा देणाऱ्या फेसवॉशची निवड करावी. त्वचा कोरडी असल्यास क्रीमी फेसवॉशचा वापर करावा. या फेसवॉशमुळे मेक अप, त्वचेतली घाण, धूळ निघून जायला मदत होईल. तेलकट त्वचेसाठी सॅलिसिस्टिक ॲसिड, कोरफड आणि टी ट्री ऑईलयुक्त फेस वॉश वापरावा. जेलयुक्त फेसवॉशचा वापर करता येईल. सर्वसामान्य त्वचा कवा दोन्ही प्रकारच्या त्वचेचं मिश्रण असेल तर अरोमायुक्त फेसवॉश वापरून बघावा.

**आजीबाईचा बटवा**

## लसूण रिकाम्या पोटी खाल्ल्याने...



लसणात अनेक औषधी गुणधर्म असतात. म्हणूनच रिकाम्या पोटी लसूण खायला हवा. उच्च रक्तदाब असणाऱ्यांनी दररोज सकाळी रिकाम्या पोटी लसूण खावा. लसणामुळे हृदयाचं आरोग्य चांगलं राहतं. लसणामुळे कोलेस्टरॉल कमी व्हायला मदत होते. हृदयरोग टाळण्यासाठी लसूण खावा. मध आणि लसूण एकत्र खाल्ल्यामुळे रक्ताभिसरण सुधारतं. पोटाच्या समस्यांवरही लसूण गुणकारी आहे. गॅस, ॲसिडिटीसारख्या समस्या लसणामुळे दूर होतात. ॲसिडिटी दूर करण्यासाठी भाजलेला लसूण खाण्याचा सल्ला दिला जातो. बद्धकोष्ठतेवरही लसूण गुणकारी आहे. पोटाच्या तक्रारी दूर करण्यासाठी सकाळी लसूण खावा. लसणात बॅक्टेरियाविरोधी आणि दाह कमी करणारे गुणधर्म असतात.

# ‘शिष्यवृत्ती केव्हा येणार?’ कचरा वेचकांच्या मुलांची आर्त हाक

## वर्षभरापासून ३,५०० रुपये शिष्यवृत्ती प्रलंबित; गुलाबपुष्प देत विद्यार्थ्यांनी समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे मांडली व्यथा, तातडीने कार्यवाहीचे अधिकाऱ्यांचे आश्वासन

नगर – साहेब, आमची शिष्यवृत्ती केव्हा येणार? आमचे आई–बाबा कचरा वेचण्याचे काम करतात. आमची आर्थिक परिस्थिती खूप अडचणीची आहे. शिक्षणासाठी आम्हाला या शिष्यवृत्तीची गरज आहे, अशा शब्दांत कचरा वेचकांच्या पाल्यांनी समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडल्या. मागील वर्षापासून शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याने अखेर विद्यार्थ्यांनी १८ सप्टेंबर रोजी थेट जिल्हा परिषद गाठत शिष्यवृत्ती मिळण्यासाठी प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी विद्यार्थ्यांनी समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांना गुलाबपुष्प देत आपल्या हक्काच्या शिष्यवृत्तीची आठवण करून दिली.



३,५०० रुपयांची शिष्यवृत्ती मिळण्यासाठी कचरा वेचकांच्या पाल्यांनी समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडल्या.

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या कचरा वेचकांच्या पाल्यांना शासनाच्या माध्यमातून दरवर्षी ३ हजार ५०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. कचरा वेचक कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी ही रक्कम शिक्षणाच्या खर्चासाठी महत्त्वाची ठरते. मात्र, अहिल्यानगर शहरातील पात्र विद्यार्थ्यांना मागील वर्षाची शिष्यवृत्ती अद्याप मिळालेली नसल्याने त्यांच्या शिक्षणासमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

शिष्यवृत्ती मिळण्यासाठी कचरा वेचक पालक अस्वच्छ व्यवसायात काम करत असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे सांगण्यात येत होते. संबंधित पालकांकडे हे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले होते. ही बाब लक्षात आल्यानंतर कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत संघटनेने याबाबत सातत्याने पाठपुरावा केला. संघटनेच्या प्रयत्नांतून संबंधित कचरा वेचक पालकांना ते अस्वच्छ व्यवसायात काम करत असल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले. तसेच अहिल्यानगर शहरातील विविध शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची नावे आणि आवश्यक कागदपत्रे संबंधित शाळांकडे देण्यात आली. त्यामुळे प्रमाणपत्राचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागला.

मात्र, आवश्यक प्रमाणपत्रे आणि कागदपत्रे उपलब्ध करून दिल्यानंतरही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याने संघटनेने पुन्हा पाठपुरावा सुरू ठेवला. गेल्या वर्षभरापासून यासाठी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे संघटनेने सांगितले. शिष्यवृत्तीच्या ऑनलाइन प्रक्रियेबाबत संबंधित विभागाकडे विचारणा केली असता, ऑनलाइन साईटच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे, असे सांगण्यात येत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. ऑनलाइन प्रक्रियेतील तांत्रिक अडचणींचा फटका गरीब कचरा वेचक कुटुंबातील विद्यार्थ्यांना बसू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे.

कचरा वेचकांचे आई–वडील शहर स्वच्छ ठेवण्यासाठी दररोज अस्वच्छ आणि प्रतिकूल परिस्थितीत काम करतात. अत्यंत मर्यादित उत्पन्नात ते आपल्या मुलांचे शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारी ३ हजार ५०० रुपयांची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसाठी मोठी मदत ठरते. त्यामुळे मागील वर्षाची प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने वितरित करण्याची मागणी करण्यात आली.

शिष्यवृत्तीचा प्रश्न प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी कचरा वेचकांच्या पाल्यांनी समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांची भेट घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी साहेब, आमची शिष्यवृत्ती केव्हा येणार? असा सवाल केला. आपल्या अडचणी सांगताना विद्यार्थ्यांनी गुलाबाचे फूल देऊन अधिकाऱ्यांचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सांगत शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. कचरा वेचक पालकांच्या अत्यल्प उत्पन्नामुळे शालेय साहित्य, शैक्षणिक शुल्क आणि इतर शैक्षणिक खर्च भागविताना अडचणी येत असल्याचेही सांगण्यात आले.

यावेळी बोलताना कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडानशिवे म्हणाले की, प्रमाणपत्राचा प्रश्न संघटनेने पाठपुरावा करून सोडविला. विद्यार्थ्यांची नावे व आवश्यक कागदपत्रेही शाळांकडे देण्यात आली आहेत. तरीही वर्षभरापासून शिष्यवृत्ती मिळालेली नाही. ‘साईट दुरुस्तीचे काम सुरू आहे’ असे सांगून विद्यार्थ्यांना आणखी किती काळ प्रतीक्षा करायला लावणार? कचरा वेचकांच्या मुलांचे शिक्षण थांबू नये, यासाठी त्यांना त्यांच्या हक्काची शिष्यवृत्ती तातडीने मिळण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले की, कचरा वेचकांच्या पाल्यांची शिष्यवृत्ती मिळेपर्यंत संघटना शांत बसणार नाही. विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आमचा पाठपुरावा सुरूच राहील. वेळप्रसंगी आंदोलन करण्याची वेळ आली, तर कचरा वेचकांच्या पाल्यांना सोबत घेऊन मोठे आंदोलन उभे करू.

विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रश्नाची दखल घेत समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांनी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांची नावे लिहून घेतली. तसेच त्यांच्या शिष्यवृत्तीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून शिष्यवृत्ती मिळण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यामुळे गेल्या वर्षभरापासून प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. ऑनलाइन प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर करून पात्र विद्यार्थ्यांना विलंब न करता शिष्यवृत्ती देण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. याप्रसंगी संघटनेचे पदाधिकारी सोमनाथ लोखंडे, मनोहर चखाले, सागर खुडे, तुषार शिंदे तसेच कचरा वेचकांचे पाल्य उपस्थित होते. समाजकल्याण अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नाची दखल घेत तातडीने कार्यवाहीच्या सूचना केल्याबद्दल कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत संघटनेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.



## गुरुवाणी – ५५
## भक्तीचे नाते..

तीर्थंकरांआधी त्यांच्या आईला वंदन केले जाते. त्यांच्या आईचे पूर्व जन्माचे कोणते पुण्य असेल? तीर्थंकरांची आई बनण्यासाठी कोणतेही तप, स्वाध्याय नाही. केवळ तीर्थंकर चेतना आहे, नाते आहे. चंडकौशिक काही केवळ एकमेव विषारी सर्प नव्हता. तरीही भगवान महावीरांची त्याच्यावर कृपा झाली. हे जन्मोजन्मीचे नाते असते. भीष्म पितामहांना पांडव आवडायचे पण नाते दुर्योधनाशी होते. त्यामुळे ते कौरवांच्या बाजूने लढले. एक नाते असते कच्च्या धाग्यासारखे जे थोडे ताणले की सहज तुटते, रेशीमाच्या धाग्याचेही नाते असते जे जास्त ताणल्याने तुटते. एक नाते असते सोन्याच्या धाग्याचे, जे कापले जाते पण ताणल्यावर तुटत नाही. तुमची नाती थोडे ताणले तरी सहज तुटतात. पण भगवान महावीर व चंदनबाला, भगवान महावीर आणि सिंधचा राजा उदयन यांच्यातील नाते सोन्याच्या धाग्याचे आहे. जन्मोजन्मीचे नाते असल्यानेच भगवान महावीर माता त्रिशलापर्यंत पोहोचले. कोणाशीही भेट दोन नात्यांनी होते, प्रेमाच्या किंवा शत्रुत्वाच्या नात्याने. बिना बोलावता तुमच्या आयुष्यात कोणी तरी येतो याला कारण तुमचे त्याच्याशी पूर्व जन्मीचे नाते असते. कर्म बंध आणि नात्याचे बंध वेगवेगळे असते. नाते ज्याच्याशी असेल त्यांच्यापर्यंत तुम्हाला नेले जाते. माता मरूदेवीची मोक्ष प्राप्तीची भावनाही नव्हती, पण तिचे ऋषभदेवांशी नाते होते. नात्यांची महिमा अपरंपार आहे. तुम्ही कोणाला बोलावले म्हणून ते तुमच्याकडे येत नाहीत, त्यासाठी नातेही असायला हवे. तुम्ही लग्न कार्याची पत्रिका सगळ्यांना पाठवता पण सगळेच काही येत नाहीत. मी इंदौरला असतानाचा एक प्रसंग आहे. एक जण जवळच्या नातेवाईकाच्या घरातील लग्नाला गेला नाही. मी कारण विचारले तर तो म्हणाला, ’त्यांनी मला पोस्टाने पत्रिका पाठवली, मी पण पोस्टाने त्यांना गिफ्ट पाठवले’. एक नाते असते भक्तीचे, एक नाते असते आसक्ती, स्वार्थाचे. आसक्तीचे नाते कधी ना कधी शत्रूत्वात बदलतेच. ’भक्ती का रिश्ता भगवान बनाते है’. भगवान महावीर निर्वाण कल्याणक अनुष्ठान त्यांच्याशी नाते जोडण्याची कथा आहे. अनेक जण विचारतात भगवानांची आराधना कधी करायची? मी म्हणतो २४ तास करा. भोजन शाळेत जेवायचे तर तिथल्या वेळेचे पालन करावे लागते. पण आईकडे जेवायचे तर कधीही मागू शकतो, तिथं वेळेचे बंधन नसते. भगवान महावीरांची भक्ती करतानाही ठराविक वेळापत्रक नसते. भक्तीचे नाते २४ तास चालूच असते. भगवानांची कृपा चोवीस तास होत असते मग त्यांच्याशी भक्तीचे नातेही चोवीस तास हवे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

## सेवानिवृत्त कर्नलची १४ लाखांची फसवणूक

नगर – फ्लॅट खरेदीच्या नावाखाली एका सेवानिवृत्त कर्नलची तब्बल १३ लाख ९२ हजार ६२५ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भोम प्रकाश दुबे (वय ६५, रा. सारसनगर, अहिल्यानगर) असे फसवणूक झालेल्या सेवानिवृत्त कर्नल फिर्यादीचे नाव आहे. १३ मे २०१३ ते १८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नगर–सोलापूर रोडवरील दरेवाडी (ता. नगर) येथे हा प्रकार घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एल.एस.व्ही.एस. डेव्हलपर्स कंपनीच्या माध्यमातून फिर्यादीला फ्लॅट खरेदी करण्यासाठी आमिष दाखवण्यात आले होते. आरोपींनी फिर्यादीकडून अग्रीमेंट करून फ्लॅटचे बुकिंग करण्याच्या बहाण्याने एकूण १३ लाख ९२ हजार ६२५ रुपये घेतले. मात्र, ठरल्याप्रमाणे फ्लॅट न देता आणि घेतलेले पैसेही परत न करता आरोपींनी विश्वासघात केला. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांनी फिर्यादीची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी सतीश वामन गिरी (रा. कोथरूड, पुणे), दिलीप प्रेमराज चंडक (रा. बेळगाव, कर्नाटक), सुशील हनुमानदास सारडा (रा. अहिल्यानगर) आणि सुयश रवींद्र लुणावत (रा. भोसलेनगर, पुणे) या चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१८ सप्टेंबरला दुपारी हा गुन्हा नोंदवण्यात आला असून, तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार करत आहेत.

# मतदार नोंदणीसाठी आजपासून विशेष शिबिरांना प्रारंभ; नोंदणी, दुरुस्तीची संधी

नगर – मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाला १९ सप्टेंबरपासून अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात सुरुवात झाली असून, विविध मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) नागरिकांच्या सेवेसाठी उपस्थित झाल्याचे दिसून आले. नवमतदारांची नोंदणी, मतदार यादीतील नावातील दुरुस्ती, नाव वगळण्याचे अर्ज तसेच विशेष सखोल पुनरिक्षणात (एसआयआर) नाव न आल्यास त्यासंदर्भातील दुरुस्तीची कार्यवाही अशा विविध कामांसाठी नागरिकांकडून अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत मतदार यादी अद्ययावत करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज, १९ सप्टेंबरसह २०, २६ आणि २७ सप्टेंबर रोजी शहर व जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष मतदार नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत.

१९ सप्टेंबर रोजी शहरातील विविध मतदान केंद्रांवर सकाळपासून बीएलओ उपस्थित झाले असून, नागरिकांना मतदार यादीशी संबंधित विविध कामांसाठी मार्गदर्शन केले जात आहे. विशेष शिबिरांमध्ये नवीन मतदार नोंदणीसाठी नमुना ६, मतदार यादीतील नाव, पत्ता किंवा अन्य तपशीलात दुरुस्तीसाठी नमुना ८, तर नाव वगळण्यासाठी नमुना ७ उपलब्ध करून देण्यात आले आहेत.



नवमतदार व दुरुस्तीसाठी आलेल्या मतदारांचे अर्ज भरुन घेताना बीएलओ.

मतदार यादीत नाव आहे की नाही, नावातील तपशील योग्य आहेत का, तसेच विशेष सखोल पुनरिक्षणाच्या प्रक्रियेत नावाची नोंद झाली आहे का, याची खातरजमा करण्यासाठी नागरिकांकडूनही मतदान केंद्रांवर चौकशी केली जात आहे.

एकही पात्र नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

### नवमतदारांसाठी विशेष संधी

१ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र तरुण, तरुणींना मतदार म्हणून नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नव्याने १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या तरुणांनी या विशेष शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नवीन पात्र मतदारांची जास्तीत जास्त नोंदणी व्हावी यासाठी जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विशेष शिबिरांच्या माध्यमातून जनजागृती व नोंदणीची कार्यवाही करण्यात येत आहे.

### महिला, दिव्यांग नागरिकांना विशेष प्राधान्य

विशेष शिबिरांमध्ये महिला तसेच दिव्यांग नागरिकांच्या समावेशकतेला विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याबरोबरच अर्ज कसा भरायचा, कोणती माहिती आवश्यक आहे आणि दुरुस्तीची प्रक्रिया कशी करायची, याबाबत बीएलओकडून मार्गदर्शन केले जात आहे. दरम्यान, मतदार यादीतील आपले नाव आणि तपशील प्रत्येक नागरिकाने तपासून पाहावेत. नाव नसल्यास किंवा नाव, पत्ता अथवा अन्य तपशीलात त्रुटी असल्यास संबंधित नमुना अर्ज भरून द्यावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.


## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनद्वारे तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील तपशीलात परिषिष्ट अ मध्ये नमुद केलेली जमीनीबाबत मे.जिल्हा न्यायालय अहमदनगर यांनी आर सी ए नं.९५/२०१६ मधील दिलेल्या आदेशा विरुध्द आमचे अशिल **याकुब शेख उमर यांचे कायदेशीर वारस शेख मोहम्मद अय्युब मोहम्मद याकुब व इतर** यांनी मे. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे सेकंन्ड अपिल नं.एस टी /२६२८३/२०२५ अन्वये दाखल केलेले असुन सदर सेकंन्ड अपिल नं.एस टी/२६२८३/२०२५ चे कामकाज आज रोजी प्रलंबित आहे.

तरी सदर जाहीर प्रगटन व्दारे तमाम लोकास कळविण्यात येते की, परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर असलेले लोकांबरोबर कोणीही खरेदी –विक्रीचा व्यवहार करुन विना कारण आपली आर्थिक फजगत करून घेऊ नये व अगर सदर व्यवहार करणेकामी सदर मिळकत खरेदी करण्याऱ्या संबंधीतांनी खरेदीखत अथवा मिळकत हस्तांतरणाचे दस्त लिहून व नोंदवुन घेतल्यास सदरचे खरेदीखत व मिळकत हस्तांतरणाचे दस्त आमचे अशिल **याकुब शेख उमर यांचे कायदेशीर वारस शेख मोहम्मद अय्युब मोहम्मद याकुब व इतर** यांचेवर मुळीच बंधनकारक राहणार नाही व संबंधीतांना सदर मिळकतीची कुठल्याही प्रकारे कायदेशीर मालकी, ताबा व टायटल प्राप्त होणार नाही याची तमाम लोकांनी सदर जाहिर प्रगटन द्वारे याची नोंद घ्यावी.

**मिळकत वर्णन :** जिल्हा तुकडी अहिल्यानगर, पो. तु. ता. नगर पैकी, अहिल्यानगर जिल्हापरिषद हद्दीतील मौजे नवनागापुर येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत –

| | गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|---|
| अ) | ५९ | ३.४७ | १४.०६ |
| | | पो.ख. 0.0४ | |
| | जुना गट नंबर ६९ | ३.५१ | |

सदर मिळकतीबाबत.
यांसी चतु:सीमा –सरकारी रेकार्ड प्रमाणे.

| | गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|---|
| ब) | ६०/१ | २.६५ | १०.२६ |
| | | पो.ख. 0.0४ | |
| | जुना गट नंबर ७०/१ | २.६९ | |

सदर मिळकतीबाबत.
यांसी चतु:सीमा –सरकारी रेकार्ड प्रमाणे.
दि. १९/०९/२०२६, अ.नगर.

**जाहीर प्रगटन देणार – शेख मोहम्मद अय्युब मोहम्मद याकुब**

**ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख (बीएएलएलबी)**
**ॲड. फैजान फारुक कुरेशी (बीएएलएलबी, डीटीएल)**
पत्ता– जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८


# जिल्हा सहकारी बँकेत नगर तालुक्याचा हक्काचा प्रतिनिधी आवश्यक : आ. कर्डिले

### आढावा बैठकीस १०७ पैकी १०२ ठरावातील मतदार उपस्थित

नगर – जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी सातत्याने प्रयत्न केले. जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेत त्यांना न्याय देण्याला त्यांनी प्राधान्य दिले. त्यामुळे आगामी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत नगर तालुक्याचा हक्काचा उमेदवार बँकेत असणे अत्यंत गरजेचे आहे, असे आमदार अक्षय कर्डिले यांनी सांगितले.



जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर तालुक्यातील पदाधिकारी, नगरसेवक तसेच बँकेच्या ठरावातील मतदारांच्या आयोजित बैठकीत बोलताना आ. अक्षय कर्डिले. (छाया – लहू दळवी)

जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर तालुक्यातील पदाधिकारी, नगरसेवक तसेच बँकेच्या ठरावातील मतदारांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला नगर तालुक्यातील १०७ पैकी १०२ ठरावातील मतदार उपस्थित होते. त्यामुळे तालुक्यातील सहकार क्षेत्रातील प्रतिनिधींची निवडणुकीबाबतची भूमिका आणि सहभाग याकडे लक्ष लागले आहे.

आ. अक्षय कर्डिले म्हणाले, जिल्हा बँक ही शेतकऱ्यांची कामधेनू बँक आहे. शेतकऱ्यांच्या कर्जापासून विविध सहकारी संस्थांच्या प्रश्नांपर्यंत अनेक बाबी जिल्हा बँकेशी संबंधित आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडायचे असतील, तर नगर तालुक्याचा स्वतःचा हक्काचा प्रतिनिधी जिल्हा बँकेत असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सर्व कारखानदार आणि सहकार क्षेत्रातील प्रतिनिधींचे लक्ष सध्या नगर तालुक्यातील मतदारांकडे लागले आहे. तालुक्याचा उमेदवार बँकेत गेल्यास शेतकऱ्यांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी जिल्हा बँकेच्या संचालकपदाची तीन वेळा, तर अध्यक्षपदाची दोन वेळा जबाबदारी सांभाळली. अध्यक्षपदावर असताना त्यांनी शेतकरी आणि सहकारी संस्थांच्या प्रश्नांना प्राधान्य देत निर्णय घेतले. प्रत्येक सोसायटीच्या सभासदांना त्यांच्या हक्काचे स्थान आणि न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी काम केले, असेही अक्षय कर्डिले यांनी सांगितले.

जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ मिळते. त्यामुळे बँकेतील निर्णय प्रक्रियेत ग्रामीण भागाचा प्रभावी आवाज असणे महत्त्वाचे आहे. नगर तालुक्यातील शेतकरी, विविध सेवा सोसायट्या आणि सहकार क्षेत्राशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी तालुक्याचे प्रतिनिधित्व आवश्यक असल्याचे यावेळी बैठकीत नमूद करण्यात आले.

आगामी जिल्हा बँक निवडणुकीत नगर तालुक्याची भूमिका महत्त्वाची ठरणार असून, तालुक्यातील ठरावातील मतदारांची भूमिका आणि निर्णयाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर, सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ, संभाजी लोंढे, भाऊसाहेब काळे, विष्णु खांदवे, अशोक झरेकर, भाजप तालुकाध्यक्ष दिपक कार्ले, मंजाबापु घोरपडे, सुभाष निमसे, रामदास सोनवणे, पोपट ढगे सह बाजार समिती संचालक, विविध पदाधिकारी उपस्थित होते.

### शेवगावच्या शासकीय औद्योगिक संस्थेत

# २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान ‘पूर्व मुलाखत प्रशिक्षण’

नगर – महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभाचे आयोजन २९ सप्टेंबर रोजी शेवगाव येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित औद्योगिक आस्थापना सहभागी होणार आहेत.

या रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या गरजू उमेदवारांसाठी २१ ते २४ सप्टेंबर या कालावधीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव येथे पूर्व मुलाखत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणामध्ये रोजगार मेळाव्याची ओळख व करिअर जागरूकता, Resume/CV प्रभावी स्वरूपात तयार करणे, मुलाखत कौशल्ये व Mock Interview, व्यक्तिमत्व विकास व संवाद कौशल्य, कार्यस्थळ सज्जता व व्यावसायिक वर्तन, क्षेत्रनिहाय कौशल्य अभिमुखता तसेच अंतिम पूर्वतयारी व Candidate Checklist या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जास्तीत जास्त गरजू उमेदवारांनी या पूर्व मुलाखत प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी उमेदवारांनी https://forms.gle/vBTzRQKYBBuBT4em7 या लिंकवर नोंदणी करावी. रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीनंतर जागेवरच निवडपत्र/Offer Letter देण्यात येणार असल्याची माहिती शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव यांच्याकडून देण्यात आली आहे.

माहितीसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **उषा अशोक आव्हाड** रा. अथर्व निवास, राघवेंद्र स्वामी मंदिराजवळ, बोल्हेगाव, नागापूर, एम आय डी सी., अहिल्यानगर यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर प्लॉट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली. आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :–** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी ग्रामपंचायत हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे निंबळक येथील सर्व्हे नं. २४२/१/१ मधील प्लॉट नं. २ याचे क्षेत्र ८१३.४७ चौ.मी. ही संपूर्ण खुली प्लॉट मिळकत.

**यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :–**
पुर्वेस :– १५ मी. रस्ता व ओपन स्पेस, दक्षिणेस :– १२ मी. रस्ता,
पश्चिमेस :– प्लॉट नंबर ४, उत्तरेस :– प्लॉट नंबर ३,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकती.
अहमदनगर, दिनांक :– १९/०९/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

## जाहीर नोटीसीस उत्तर

तमाम लोकांस या जाहीर नोटीस उत्तराने कळविण्यांत येते की, मौजे केडगाव हद्दीतील सर्व्हे न ५१/२ड क्षेत्र 00 हे ३९ पैकी 00हे १४.५0 आर या मिळकती बाबत दैनिक नवा मराठा या वर्तमान पत्रात दि. ०९/०९/२०२६ रोजी ॲड. आनंद भगवानराव व्यवहारे यांनी त्यांचे अशिल विश्वजित रमेश कासार व श्रीकांत गुलाब दिवटे यांचे करिता प्रसिद्ध केलेली जाहीर नोटीस आमचे अशिल रामदास किसन औताडे यांचे नुकतेच वाचण्यात आली असून सदर जाहीर नोटीस मधील मिळकत खरेदी विक्रीचे व्यवहारास आमचे अशिलांची तीव्र हरकत आहे. वास्तविक पाहता, सदर जाहीर नोटीस मध्ये नमूद मौजे केडगाव हददीतील सर्व्हे न ५१/२ड ही प्रवीण सुरेश लहारे यांचे मालकीची असून सदर प्रवीण सुरेश लहारे यांनी अशोक सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जास आमचे अशिल जामीनदार होते व सदर कर्ज थकीत झाल्याने सदर बँकेने प्रवीण सुरेश लहारे यांचे विरुद्ध वसुली करिता कारवाई चालु केली होती. दरम्यान प्रवीण सुरेश लहारे हे त्यांचे विरुद्ध दाखल गुन्ह्यात कारागृहात होते. त्यावेळी सदर वसुली कारवाईचे अनुषंगाने थकीत कर्ज रक्कम भरण्याची प्रवीण सुरेश लहारे व त्यांची पत्नी अर्चना प्रवीण लहारे यांनी जामीनदार म्हणून आमचे अशिलास विनंती केली व सदर भरलेल्या रकमेपोटी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे. त्यांनंतर आमचे अशिलांनी सदर थकीत कर्जाची संपूर्ण रक्कम प्रवीण सुरेश लहारे यांचे करिता व वतीने बँकेचे कर्ज खात्यात भरलेली आहे. दरम्यान सदर रक्कम भरले नंतर प्रवीण सुरेश लहारे यांनी सदर मिळकतीचे कबूल केल्याप्रमाणे खरेदीखत आमचे अशिलांना लिहुन दिलेले नाही व आमचे अशिलांना डावलून सदर मिळकत विक्रीचे प्रयत्न चालविले आहेत. त्यामुळे वरील मिळकती बाबत सदर प्रवीण सुरेश लहारे यांचेशी कोणीही कोणतेही प्रकारे खरेदी विक्री अथवा अन्य प्रकारे हस्तांतराचे व्यवहार करु नयेत, केल्यास खरेदी घेणारे इसमास कोणतेही मालकी हक्क, कब्जा व अधिकार प्राप्त होणार नाहीत याची नोंद घेण्यांत यावी, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही जाहीर नोटीस उत्तर प्रसिध्द केले असे. आमचे अशिल – श्री. रामदास किसन औताडे
पत्ता– रा. केडगाव, ता. जि. अहिल्यानगर.
ता.१९/०९/२०२६

**ॲड. रविंद्र सुभाष रक्ताटे** (बीसीए, एलएलबी)
पत्ता–बार रूम नं.५, जिल्हा न्यायालय इमारत
अहिल्यानगर, मो.७०३०४७०९४७, ७०२०८८७६१९


# १०० विद्यार्थ्यांची जबाबदारी एकाच शिक्षकावर

## मुकुंदनगर फकीरवाडातील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील विशेष शिक्षक परत देणे किंवा नवीन अतिरिक्त शिक्षक नेमणे

नगर – मुकुंदनगर येथील फकीरवाडा उर्दू शाळेमध्ये पटसंख्या मोठी असतानाही येथील नियुक्त विशेष शिक्षकांची इतर शाळेत बदली/नियुक्ती करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. सध्या सुमारे १०० विद्यार्थ्यांची जबाबदारी अवघ्या एकाच शिक्षकावर पडली असून, प्रशासनाने तात्काळ या प्रकरणी लक्ष घालून शिक्षकांची नियुक्ती करावी, अशी आक्रमक मागणी माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी केली आहे.

या संदर्भात शेख मुदस्सर यांनी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि शिक्षण मंडळाला निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, फकीरवाडा उर्दू शाळेत पूर्वी नियमित शिक्षकांसोबत विशेष शिक्षक किंवा अतिरिक्त शिक्षक उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण होत होत्या. मात्र, या शाळेतील विशेष शिक्षकांना कोणत्या आदेशावरून व कोणत्या नियमाच्या आधारे इतरत्र वर्ग करण्यात आले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. एकाच शिक्षकावर १०० विद्यार्थ्यांची जबाबदारी असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडवणे, अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणे आणि गुणवत्तेचे मूल्यमापन करणे अत्यंत कठीण झाले आहे. शिक्षकांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कावर व गुणवत्तेवर गदा येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

प्रमुख मागण्या खालील प्रमाणे – विशेष शिक्षकांना इतर शाळेत कोणत्या आदेशाने पाठवले, याची चौकशी करून तो आदेश उपलब्ध करून द्यावा, मूळ नियुक्ती असलेल्या विशेष शिक्षकांना तात्काळ पुन्हा फकीरवाडा उर्दू शाळेत रुजू करून घ्यावे., १०० विद्यार्थ्यांची पटसंख्या लक्षात घेता तातडीने अतिरिक्त व विषयनिहाय शिक्षकांची नियुक्ती करावी, प्रशासनाने प्रत्यक्ष शाळेची पाहणी करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी कायमस्वरूपी अतिरिक्त शिक्षक व्यवस्था करावी., शासनाने आणि प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल न घेतल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान रोखण्यासाठी योग्य ती पावले उचलली जातील, असा इशाराही शेख मुदस्सर यांनी दिला आहे

